मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

पु. य. देशपांडे
रा. त्रि. काळी
कुसुमावती देशपांडे
नी. र. वऱ्हाडपांडे
सौ. कमला सुरडकर
पां. ब. गाडगीळ
श्री. मा. कुलकर्णी
अ. ना. देशपांडे
पां. कृ. सावळापूरकर
सुरेश डोळके

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

श्री
विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषयः सारस्वती जननम्

ऑक्टोबर १९५४
किंमत आठ आणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष ९ वें] ऑक्टोबर १९५४ [अंक ७ वा

संपादक

पु. य. देशपांडे

संपादक–मंडळ

कुसुमावती देशपांडे
पां. व. गाडगीळ
गो. रा. दोडके
ग. त्र्यं. माडखोलकर
के. ज. पुरोहित
ना. रा. शेंडे

या अंकांत

कै. श्रीनिवास रामचंद्र बोबडे —रा. वि. काळी
मराठींतील पत्रवाङ्मय —कुसुमावती देशपांडे
हें...की...तें ? —पु. य. देशपांडे
शोषण की पोषण ? —नी. र. बऱ्हाडपांडे
विदर्भांतील कांहीं लोकगीतें —सौ. कमलाबाई सुरडकर

साहित्य समालोचन— सुरेश डोळके, श्री. मा. कुलकर्णी, पां. कृ. सावळापूरकर, पां. व. गाडगीळ, अ. ना. देशपांडे.

कविता— म. म. देशपांडे, गुणाकर देशपांडे, वसंत वऱ्हाडपांडे, निशिकांत करकरे, गणेश पाठक, विनायक पाठक, मधु वाबगांवकर, कै. बोबडे.

याशिवाय, संघवार्ता

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री ... दफ्तरी स्मृति
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

युगवाणी वर्ष ९ ऑक्टोबर १९५४ अंक १०

क वि ता

बद्ध

भावनेचा हात मागें
ओढणारें कोणीतरी
आहे म्हणूनच राहे
बोलायाचें कितीतरी !

चालतांना पावलांत
कोठूनशी पडे बेडी
मागें वळलो तरीहि
माझें अंतरच तोडी !

मागें ओढणारें मला
आहे जसें एक कोणी
मागें वळल्या वरती –
–जाब मागणारें कोणी !

म्हणूनीच बद्ध असा
कात्रींतच एका जागीं
जखमेला वागवीत
खोल हृदयाच्या भागीं !

— म. म. देशपांडे

कळी !

कळी झोपली आहे रे !
नको तिजला जागवूं
स्वप्न पापण्यांवरचें
नको उगाच हालवूं.

दोन घटकांच्या स्वप्नीं
जीवा रमवूं दे तिला.
गंध मातीचा पिवून
सारें विसरूं दे तिला.

उद्यां उमलेल तीच
गंध भरेल वाऱ्यांत
किती भ्रमरांच्यासाठी
जीवा लावील ती तांत.

आणि कुणाच्या पूजेची
उद्यां वाट बघेल ती
हांसतच पायापाशीं
देईलहि प्राणाहुती.

कळी झोपली आहे रे !

— गुणाकर देशपांडे

येता माणुसकीला जाग !

खडखडाट चाले यंत्रांचा भंवताल
—वाजवी शल भेसूर काल चिरकाल !
इंद्रियें जाहलीं बधिर कर्णकटु नादें
विसराया साधन बघतों मग एखादें !

श्रमभारें झालें बघतां जग व्याकूळ
मायेचा फिरवित कर ये सायंकाळ
मी तदा मनावर चढलेलीं घनदाट
वल्कलें फेकुनी करितों तें मोकाट !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सृष्टीचें बघतां प्रसन्न मोहक रूप
क्षणि विलय पावतो थकवा आपोआप
अन् नव्या उमेदी बंड करी चित्तांत
आईच्या अंकीं बाळ जसें दिनरात !

आकर्षक इमले सहजच भरतीं नयनीं
अन् दृष्टि धावते आंत गवाक्षांमधुनी.
–विसरूनि जगा कुणि रमणी करिते साज
हटवादी डोळे बघती पुष्ट उरोज !

तों जवळ अचानक बघतां एक भिकारी
हें हळवें माझें अंतःकरण विदारी.
लोचनांत एका राग पेटवी आग
जल दुजांत येता माणुसकीला जाग !

– वसंत वऱ्हाडपांडे

चांदण्या रात्रीं

हो वाजव सखया सारंगी दे ऐकूं मनमुराद !
जीवनाच्या रागदाऱ्या
भावपूर्ण गोड हंसऱ्या
त्या ऐकव ताना, त्यावर विहरूं ये सोडून लाज !
गायनानें देहभान
जाय जेव्हां हारपून
तइं घालिन तुजला नयनांनी रे मोही मूक साद !
भावना ये मोहरूनी
गोड सारंगीमधूनी
लाटांवरि लाटा मंद उठूं दे माझ्या हृदि अगाध !
चांदण्या एकांत रात्रीं
भरति येई हृदयिं भारी
नच उसळे लाटा, घाली मजला बंधाचाच बांध !

-- निशिकांत करकरे

एकच आशा

कमलदळासम नसोत डोळे
नसो चारुता सौष्ठव गात्रीं
नितळ केतकी वर्ण नसो पण
प्रिय तूं मजला मम सावित्री

उमाप उडुगण नभीं नाचती
चंचल तेजीं नजर ठरेना
अल्पत्वाचें जीवन जगती
भविष्यांतल्या केवळ उल्का !

सुरम्यरंगीं मोहक सुमनें
मिरविति केवळ वरचा डौल
रसगंधाविण शुष्क पाकळ्या
दिखावटीला कसलें मोल ?

कलाकुसर ज्यां होय पारखी
फुलें निरागस अशीं भावडीं
उधळुन देती वाऱ्यावरती
सांद्र रसांतिल गंध नव्हाळी

नवनीताची सहजमृदुलता
अखंड पाझर प्रीतिजलाचे
झुळझुळती ज्यांमधुनी ऐसे
हृदय अनामिक विरळें साचें

कौरुप्यांतहि वसो मधुरिमा
अंतर्यामीं शब्दातीत
आशा एकच तुजपासुनि ही
नको होउं दे तिचें कलेवर !

– गणेश पाठक

रोज सकाळीं

दिवसाच्या आशेवर
निशेनें शाल टाकली
पांढऱ्यावर झालें काळें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिवसाचें उज्वल महाकाव्य
जणूं काळवंडलें
जग जगण्याची मीमांसा करीत
बरळत होते, घोरत होते
मतामतांचे दूषित जंतू
हवेंत स्वैर विहरत होते
कोंदट, दमट वायमण्डल
करण्या निर्मल
महान् मंगल
'स्प्रे' करतो तो
सूर्य सकाळी, रोज सकाळी !!

-- विनायक पाठक

आज-उद्याचें गाणें

"भिकार या जगीं, इच्छित न मिळे कांही
म्हणुनी तुझे पायीं, भिक्षांदेहि"
– केशवसुत.

काय हवें होतें आणि
लाभलेलें काय हातीं
काय लाभणार उद्या
कुणी उकलाव्या गांठी ?

आहे उद्याच्या आशेचें
थोडें मधाळ चाटण
ओठाचिया कडेवर
राहे थेंब ओठंगून

जरा फिरवावी जीभ
खुळा जीव हरखावा
घोट निराशेचा आज
कडू जहर गिळावा !

-- मधु वाबगांवकर

कै. बोबडे यांची शेवटची कविता

मृत्युलेख

होता कुणी जगांत ॥धृ॥

नाही ठिकाणठाव
नाहीच नांवगांव
येथें वसोनी गेला
कुणि एकटा अनाथ १

येथें जलप्रवाही
आला वहात आला
वाऱ्यावरी इयोनी
गेला वरी नभांत २

हंसला कळयाफुलांत
वसला विहंगमांत
शीतोष्ण तरुतळीचे
जिव गुंतला वनांत ३

प्रभुगीत आळवीत
ओठांतलें मनांत
स्वानंद लीन झाला
एकांत निर्जनांत ४

मउ मोकळया घरेला
पानांत झांकलेला
डोळे मिटोनि येथें
बिरला चिरंतनांत ५

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. श्रीनिवास रामचंद्र बोबडे

लेखक

रा. वि. काळी

[ता. १ आक्टोबर हा कै० श्रीनिवास रामचंद्र ऊर्फ अण्णाजी बोबडे यांचा स्मृति-दिन होय. या त्यांच्या विसाव्या स्मृति-दिना प्रीत्यर्थ 'युगवाणी' श्री. रा. वि. काळी यांचा परिचयपर लेख सादर करीत आहे. या लेखाचे लेखक श्री. रा. वि. काळी हे शैलीकार व साहित्यमर्मज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या खास भाषाशैलीनें नटलेला हा कविवर्य बोबड्यांचा संक्षिप्त परिचय 'युगवाणी'च्या वाचकांना खासच आवडेल. –संपादक]

हंसला कळ्याफुलांत
वसला विहंगमांत ।।

आपलें पूर्वायुष्यच जणु काय अण्णाजींनी वरील कवितेंत चित्रित केलें आहे ! त्यावेळचें श्रीनिवास रामचंद्र बोबडे उर्फ अण्णाजी यांचें जीवनच मुळी तसें होतें. वनीं उपवनीं वसावयाचें, कळ्याफुलांशीं हंसायचे आणि राघूमैनासह विहरायचे असा त्यांचा पूर्वायुष्यक्रम होता. कपड्यालत्त्यांत, छानछोकींत आणि ऐषारामांत लोळणारे अण्णाजी तरुणांच्या चर्चेचा विषय होते. त्यांची युवावस्था भैय्यासाहेबांसारख्या वत्सल बंधूच्या सुखद शीतलतेंत, संपत्तीच्या साम्राज्यांत आणि सुखासीन सुहृदांच्या सान्निध्यांत व्यतीत झाली. आणि म्हणूनच असामान्य बुद्धीचे पंख असूनहि त्यांना परीक्षेची भरारी मारतां आली नाही. मनावर घेतलें असतें तर रात्रीचा दिवा जाळून ते केव्हांच वकील झाले असते. पण असें रुक्ष व सारखेंच सारखें जीवन त्यांच्या मनोधर्माला रुचत नव्हतें. रंगीबेरंगी फुल-पाखरांचा स्वभावच मुळी तो नव्हे ! आजूबाजूंच्या आरामांत क्षणैक विश्राम घ्यावा, पुष्करणींत अवगाहन करावें, बहरलेल्या चूतांकुरांचें शरसंधान करावें, पुन्हा थोडें चालूं लागावें, अशा चंडोलवृत्तीने गात नाचत रखरखीत, भयाण व लांबचलांब आयुष्यवीथिका आक्रमण करावी हा त्यांचा देहस्वभाव ! आणि त्याला अनुकूल परिस्थितीची जोड !! मग काय

शशिना च निशा । निशया च शशी
शशिना निशयाच विभाति नभः

असें त्यांचे पूर्वायुष्याचें नभोमंडळ शृंगारित झालें असलें तर त्यांत नवल काय ?

अण्णाजींचें प्रत्यक्ष दर्शन मला सुमारें ३८ वर्षां-पूर्वी हॉकी खेळतांना झालें. त्यांची मूर्ति प्रेक्षणीय किंवा विशेष छाप पाडणारी होती असें नाही. उलट त्यांना बुद्धीच्या व्यस्त प्रमाणांत असणारे शरीरसौष्ठवच (?) लाभलें होतें; पण त्या किडकिडीत मूर्तींत असामान्य बुद्धिमत्ता, उदार प्रेमलता, कांटेकोर गृहस्थता व वज्रसमान निश्चितता इ. गुणसमुच्चय वास करीत होता. त्यांच्या तेजस्वी डोळ्यांतून वरील गुणांच्या किरणांची आभा फांकली होती. प्रथमदर्शनी त्यांचा तो रुबाब, त्यांचे तें अभिजात (aristocratic) वर्तन, नवपरिचिताशीं होणारें त्यांचें तें 'रईसी' मितभाषण इत्यादिमुळें नवखा माणूस मनांत जरा प्रतिकूल ग्रह धरून बसायचा. पण परिचय जसजसा वाढत जाई, तसतशी स्नेहाची सूर्यमुखी त्यांच्याकडे आकर्षिली जाई. बाह्यतः करारी व कठोर दिसणारा त्यांचा हृदय-चंद्रमणि स्नेहेन्दुकिरणाचा स्पर्श होतांच हळुवार पाझरत जाई, हा त्यांचा स्वभाव विशेष होता.

त्यांची बौद्धिक व पार्थिव संपद्, सुखमय विलासी जीवन, अभिजात्य पाहूं जातां माझा त्यांचा परिचय होणें एक अवास्तव गोष्ट होती आणि म्हणून मी आपली पायरी ओळखून, त्यांच्या सहवासाची इच्छा मनांत दाबून, त्यांच्याशीं जरा फटकूनच वागत होतो. पण योगायोग मोठे विचित्र असतात ! अगदीं समोरा-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समोरचें चक्रवाकयुगुल अंधःकाराच्या अंतरायामुळे सहवाससुखाला आंचवतें आणि हजारों कोसावरची स्त्रोतस्विनी सागराकडे आकर्षिली जाते. तसें म्हटलें तर अण्णाजींच्या आंतर–मित्रवर्तुळांत (inner circle) बसण्याचा मान मला कधीहि मिळाला नाही व मी तो अभिलाषिलाहि नाही. पण त्यांच्या त्या सरल व उदार स्वभावाला या भेदभावाचें वाकडें होतें. त्यांचा परिवार-पिसारा (trail) मोठा चित्रित असून त्यांच्या स्नेहाची फुलबाग रंगीबेरंगी फुलांनी नटलेली असे.

नागपुरांत तेव्हां टेकाडे, उपाध्ये, बोबडे ही कवि – त्रयी फार विख्यात होती. टेकाडे माझे शेजारी म्हणून त्यांच्या कविता वाचाय–ऐकायचा मला वारंवार प्रसंग येई. उपाध्ये, बोबडे यांची टेकाड्यांकडे ये–जा असेच. उपाध्येहि मधून मधून आपली कविता दाखवीत. पण अण्णाजी ? प्रसिद्धीविमुख अण्णाजी आपल्या कविता मला दाखवितील ही आशा करणें तेव्हां मला वेडेपणाचें वाटत होतें. त्यांना तशी विनंती करणेंहि फार दुरापास्त होतें. कारण साधारण परिचयाच्या माणसाला तेवढा धृष्ठपणा करतां येत नव्हता. शिवाय 'वळलें तर सूत नाही तर भूत' अशी त्यांची ख्याति होती. गोष्टांतील गृहिणी किंवा महमूद गझनीची दौलत तरी एखादे वेळेस दृष्टिगोचर होईल पण अण्णाजींच्या कविता ? त्या पाहायला व वाचायला मिळाव्या याची सारखी तळमळ लागली पण कांहीच जमेना. अखेर ईशदयेने तो प्रसंग आला आणि तेव्हांपासून त्यांचा माझा परिचय दृढ होऊं लागला. त्या सुमारास म्हणजे १९२२–२३ सालीं नागपुरास कवि – सम्मेलन भरण्याचें घाटत होतें. त्यानिमित्त कै. बुवा उपाध्यें, बाबूराव केळकर, दिवंगत बाळाजी गोसावी यांच्याबरोबर अण्णाजींकडे जाण्याचा प्रसंग आला. बाकीची मंडळी यायची होती. बोवां (उपाध्ये) नी आपली हास्यरसमय 'गीता' म्हणून दाखविली. आणि हळूंच अण्णाजी आपली चोपडी काढून

अरे आला कवी आला आता धांवा
पळा लपा
पाठीराखे स्मरा किंवा रामरक्षा
तरी जपा

ही विनोदी कविता वाचूं लागले. तोंच इतर कवि–गण तेथे आला. त्याबरोबर इतका हंशा पिकला की, त्यामुळे सारें घर दणाणलें. अण्णाजींनाहि हंसे आवरेना. त्यादिवशीं एवढेंच झालें. पण त्या प्रसंगाने आमची भीड बरीच चेपली. दुसऱ्या रविवारी पुन्हा आम्ही जमलों. प्रथम श्री. माधकरांनी आपली विनोदी कविता– श्री. जागोबा पारखी यांच्या अंगणावर व म्हशीवर केलेली – म्हणून दाखविली. ती अण्णाजींना फार आवडली. नंतर बोवांनी अण्णाजींची 'पंढरी' कविता म्हटली. कविता सुंदर खरी पण तिच्या विशिष्ट चाली– लकबीमुळे कविसम्मेलनांत श्रोत्यांनी तिची हुर्यो उडविली होती. त्यामुळें आम्हांलाहि हसूं आलें. या विनोदामुळे आम्ही बरेंच धीट झालों. नंतर उपाध्यांनी 'गडि मर्द मराठा वीर' 'हरहर महादेव बोला' आणि 'रंगपंचमी' इत्यादि कविता अण्णाजींच्या समोरच त्यांना न विचारतां, म्हणण्याचा क्रम चालूं ठेवला. आम्ही ऐकतां ऐकतां तल्लीन झालो. नंतर अपूर्ण 'शृंगार संगीता'तील कांही वेचें उपाध्यांनी आम्हाला ऐकविले व अखेर 'परिचयाचें प्रेम' व 'प्रेमाचा परिचय' या दोन सुंदर कविता म्हणून बैठक संपविली. त्या दिवशीं आम्हांला अण्णाजींच्या कवितेचें यथेच्छ श्रवण घडलें. आणि त्यांच्या उच्च काव्यगुणांची साक्ष पटली. त्यांच्या रसवंतीचें व काव्यकुशलतेचें वर्णन करणें स्थलाभावीं शक्य नाही.

जसजसा माझा अण्णाजींचा परिचय वाढूं लागला तसतसें त्यांचा स्वभाव व स्वरूप आकलन होण्याऐवजी व समजण्याऐवजी ते मला एक गूढपुरुष (Mystic) वाटायला लागले. अतिनिकट व सतत सहवासाच्या स्नेह्यांखेरीज इतरांना त्यांच्या स्वभावाची खरी ओळख मुळीच होत नसे. त्यामुळे व त्यांच्या लहरी व हट्टी स्वभावामुळे बाहेर फार गैरसमज पसरत. कित्येक गोष्टी ते मुद्दाम व हेतुपुरस्सर करीत. ते सुशिक्षित व सदाचरणी लोकांशीं जितकें मिसळत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तितकेंच किंबहुना जास्त अडाणी, बदफैली व व्यसनी लोकांतहि वावरत. नव्हे त्यांच्या सहवासांत आपण आनंद मानतों व आपणहि तसेंच आहोंत अशी लोकांत समजूत पसरावी अशीच त्यांना इच्छा होई. पण वस्तुस्थिति निराळी होती. इतवारींतील गुंडांशीं व छाकटयांशीं त्यांचा इतका स्नेह की कोठे मारामारी झाली, दारूचा दंगा झाला किंवा इष्काचा प्रकार घडला की त्यांचा सर्व पाढा खुद्द अपराधी अण्णाजीं-जवळ वाचायचा. इतका त्या लोकांचा अण्णाजींवर विश्वास, प्रेम व आदरभाव. पण अण्णाजी त्यांच्याशीं जी इतकी 'घनी दोस्ती'–सलगी दाखवीत त्यांत त्यांचा निराळाच हेतु असे. व्यसनी माणसांना प्रेमानें वश करून त्यांना जरवेंत ठेवायचें,बरोबरीच्या नात्यानें वागून त्यांना आपल्या व्यसनाची लाज वाटायला लावायची व शक्य तितका वेळ आपल्या सहवासांत ठेवून त्यांना त्यांच्या व्यसनाकडे प्रवृत्त व्हायला अवकाश मिळूं द्यायचा नाही ह्या आंतरिक हेतूमुळे ते अशा व्यसनी लोकांच्या गराड्यांत नेहमी असत. कांही 'बडे बाप के बेटे' निरनिराळ्या 'ढंगात फसून संपत्तीची व शरीराची धूळधाण करण्याच्या अवस्थेंत असतांना' अण्णाजींनी त्यांना आपल्या पाशांत अडवून त्यांना व्यसन परावृत्त केलें, किंवा त्यांच्या 'ढंगांना' आधुनिक व सुव्यवस्थित वळण लावून ताळ्यावर आणलें ही गोष्ट नागपूरच्या बऱ्याच लोकांना ठाऊक आहे.

स्वतःचा हेतु किंवा स्वभाव लोकांना कळूं न देतां उलट स्वतःविषयीं गैरसमज वाटेल तितके पसरावेत व त्यांत आनंद मानावा असा अण्णाजींचा स्वभाव होता. त्यामुळेच अण्णाजी बरेंच दिवस मला एक गूढ (Mystery) वाटले पण कालांतरानें त्यांच्या स्वभावाची व हृदयाची हळू हळू पारख व्हायला लागली. तल्लख बुद्धि, परिशीलन, वक्तृत्व, मौलिक कोटिक्रम इत्यादि वकीलीला आवश्यक गुण अण्णाजींच्या अंगीं होते. हिंदू कायद्यावर ग्रंथ लिहायचा त्यांचा मानस होता. करालकाळानें त्यांना ओढून नेलें नसतें तर कायद्याच्या वाङ्मयांत एका मौलिक व अपूर्व ग्रंथरत्नाची भर पडली असती. पण– !!

रुक्ष दिनक्रमास जुंपून घेणारा गवई जसा वेळांत वेळ काढून आवडत्या चार दोन लकेरी मारून मनो-रंजन करून घेतो तसाच अण्णाजींचा रसिक व गुण-ग्राही स्वभाव त्यांना वाङ्मयाकडे दुर्लक्ष करूं देत नव्हता. कायद्याच्या क्लिष्ट कटकटींतच त्यांना मार्मिक व सुंदर कोटया सुचत, आणि रूलींग्ज् वाचतांनाच ते समर्पक उपमा दृष्टांत देत. त्यांचें 'शृंगारसंगीत' १९२३ पर्यंत बरेंच रचून झालें होतें. मधून मधून त्यांची काव्यरचना चालूंच होती. त्यांचा साहित्यिक मित्र-परिवारहि विस्तृत होता. आणि त्यांत त्यांनी कोणत्याच तऱ्हेचा प्रादेशिक अभिमान धरला नव्हता. त्यांना गुणांची पारख असून 'गुणिषु न च जातिर्नच वयः' असें त्याचें वर्तन होतें. कवि–सम्मेलनाचीं सूत्रें आंतून हलवून सारें श्रेय त्यांनी श्री. केळकरांना दिलें. बाररूम-मधील त्यांचें संभाषण विनोदी व समर्पक असे. त्यांच्या कल्पना, उपमा, कोटया व चाटूक्ति इतक्या नवीन व स्फूर्तिजनक असत की कित्येकांनी त्या चोरून त्यावर आपल्या लेखनाचा इमला उभारायचा. हें 'चौर्य' वा ही उसनवारी त्यांच्या लक्षांत आली तरी त्याबद्दल आमची चार चौघांत प्रशंसा करून त्याचें सर्व श्रेय ते आम्हा-लाच देत ! इतका त्यांचा उदार स्वभाव !! त्यांच्या अंगीं स्वतंत्र व अभिजात विनोद होता व मनांत आणलें असतें तर ते उत्तम विनोदी लेखक म्हणून सहज प्रसिद्धीला आले असते. अजूनहि त्यांच्या अप्रकाशित व अल्पस्वल्प लिखाणावरून वरील विधा-नाची सत्यता प्रत्ययाला येते. चार चार, दोन–दोन ओळींच्या विनोदी कविता त्यांनी कितीतरी लिहिल्या आहेत 'विडंबन,' 'प्रीतिविवाह,' 'लग्न कचेरींत नोंदुन झालें' 'प्रणयाच्या तीन अवस्था,' 'आला आला कवी आला,' 'नाटकी पोरावरील कविता,' 'वेश्या,' 'हृदयेश्वर' इत्यादि कवितांत सोज्वळ व मार्मिक विनोद विखुरला आहे. विनोदी गद्यहि लिहिण्यांत त्यांचा हात-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धंदा असे. १९२६-२७ सालीं नागपूर ॲडव्हर्टाईझर म्हणून विनोदी वर्तमानपत्र निघत असे. त्यांत 'वारल्म-मधील मौजा' नांवाचे दोन लेखांक प्रसिद्ध झाले होते. त्यांतला बराचसा विनोद व कोटचा अण्णाजींच्या होत्या ही गोष्ट आताप्रमाणे तेव्हांहि बऱ्याच लोकांना माहीत होती आणि तो विनोद इतका सुंदर होता की त्यामुळे नागपूर ॲडव्हरटाईझरला नागपूर वऱ्हाडांत फार मागणी येऊ लागली. एवढेंच नव्हे तर पुण्याच्या बार ॲसोसिएशननेंहि ते विनोदी लेख मागविले. याशिवाय 'विचक्षण' या टोपण नांवाखाली 'वागीश्वरी'च्या पहिल्या वर्षाच्या अंकांत 'अभिमान,' 'मनाजोगी बायको,' 'आगगाडीचा प्रवास' 'हुक्का' इत्यादि लेख प्रसिद्ध झाले आहेत ते सर्व अण्णाजींचेच होत. त्यांतील उपमा दृष्टांत विनोद इत्यादि तर उत्कृष्ट आहेतच, पण लेखनशैलीहि अप्रतिम व सफाईदार आहे. वकिलीला वाहून न घेतां त्यांनी जर साहित्याचा संसार थाटला असता तर विनोदी वाङ्मयाचे खुसखुशीत खाद्य निर्माण करण्यांत त्यांनी मुळीच कसर ठेवली नसती.

आपल्या परिवाराला व स्नेही सुहृदांना शोक-सागरांत ढकलून अण्णाजी हास्यमुखाने मृत्यूशीं झगडून त्यावर मात करून कालवश झाले. त्यांच्या सहवासांत लाभलेल्या सुखद क्षणांची स्मृति अजून हृदयांत जागृत आहे. 'मरे एक त्याचा दुजा शोक वाहे' या न्यायाने आज आम्हां मित्रांना मनुष्यधर्माला अनुसरून नुसता शोक करण्याखेरीज दुसरें काय उरलें आहे ? आणि शोक करतांना दुःखाचें इतके उसासे येतात, अंतःकरणांत इतकी कालवाकालव होते आणि डोळ्यासमोर विषण्णतेचा इतका कालिमा पसरतो की

Love is smoke raised with
the fume of sighs.

हें अवतरण सत्य वाटायला लागतें.

(वागीश्वरी)

विदर्भ साहित्य संघ, प्रकाशन नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी-मराठी भाषा प्रवेशिका

लेखिका : मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी. किंमत : सव्वा रुपया

एकमेव विक्रेते : कर्मवीर बुकडेपो, महाल, नागपूर २

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठींतील पत्रवाङ्मय

-- कुसुमावती देशपांडे

आपल्या पोस्टखात्यानें उत्पन्न सध्या कित्येक कोटींच्यावर असेल. इतकीं अगणित पत्रें वर्षानुवर्ष लिहिलीं जातात, वाचलीं जातात. पण त्यांच्यापैकीं किती थोडयामध्ये वाङ्मयीन गुण आढळतील ! बहुतेक सारीं ठराविक कुशल वृत्तांतांची, व्यापारी व्यवहारांची, नैमित्तिक तक्रारी–अर्जांचीं असणार. काळ पालटला, नैमित्तिक गरजा बदलल्या, लिहिणाऱ्या किंवा ज्यांनी तीं लिहिलीं त्या व्यक्ति काळाच्या ओघांत विलीन झाल्या तरीहि ज्यांचें मोल कायम राहील अशी मानवी भावभावनांच्या स्पंदनानें भरलेलीं पत्रें फारच थोडीं. त्या मानानें पाश्चात्य देशांत अशीं पत्रें वरींच सांपडतील. पत्रलेखन हे एक हौशीचें, कलात्मक काम असें समजून तें फार कुशलतेने करणाऱ्या व्यक्ती पाश्चात्यामधें बऱ्याच सांपडतील. त्या पत्रांचें क्षेत्र दोनच व्यक्तींपुरतें मर्यादित असलें तरीहि एखाद्या कलाकृतीप्रमाणें त्यांत आपला जीव ओतणारी मंडळी तेथें सांपडतील. त्याच्या पत्रांत त्यांच्या जीवनांतील आशा–निराशांचें संगीत ऐकूं येईल. त्यांच्यापुढील समस्यांचे पडसाद त्यांत सांपडतील. त्यांच्या जीवन-निष्ठा व तत्व–प्रणाली यांचा प्रकार त्यांत आढळून येईल आणि अशा तऱ्हेने त्यांच्या उभ्या व्यक्तित्वाचा साक्षात्कार होईल. अशा मानवी मूल्यांमुळे तीं पत्रें चिरंजीव होतात. १९ व्या शतकांतील जेन वेल्श आणि कार्लाइल यांच्या पत्रसंग्रहाच्या ग्रंथांनी अगदी अलिकडे दोन तीन वर्षांपूर्वी आचार्य अत्रे यांचें मन किती हालवून सोडलें होतें. त्यांच्याहि आधीच्या कीट्स्च्या पत्रांचीं पारायणें तर कितीकच लोकांनी केलीं असतील. लॉर्ड चेस्टरफील्डसारख्या त्याहि पूर्वीच्या कांही मंडळींनी उपदेशप्रधान पत्रलेखन केलें व त्यांच्या मुलाच्या निमित्ताने अनेक पिढ्यांचें मार्गदर्शन झालें. पत्रवाङ्मय हा असा अभावितपणें वाङ्मयाच्या पदवीला प्राप्त होणारा आणि म्हणूनच कदाचित इतर बऱ्याच वाङ्मयप्रकारांपेक्षांहि अनेकदां अधिक सरस, सच्चा व परिणामकारक ठरणारा प्रकार आहे.

सर्व चांगल्या वाङ्मयामध्यें जसा व्यक्तित्वाचा आविष्कार होतो तसा त्यांत काळाचाहि ठसा सांपडतो. त्या त्या काळची सामाजिक परिस्थिती, राजकीय वातावरण, जीवनविषयक विचार इत्यादिंची छाप आढळून येते. पत्रसंग्रहांतहि तसेंच होतें. या दृष्टीने तर पत्रांचे महत्व एका दैनंदिनीखेरीज इतर कोणत्याहि वाङ्मयप्रकारांपेक्षां अधिक समजतां येईल. जाणत्या, विशाल मनाच्या, संस्कारक्षम बुद्धीच्या व्यक्तींच्या दैनंदिन्या किंवा पत्रसंग्रह म्हणजे त्या त्या काळाचा जिवंत ठसाच म्हणतां येईल. या अशा सामुग्रीवरून त्या काळाचे चित्र पुढील पिढ्यांनी जाणावयाचें. ही त्या काळाची एक असंदिग्ध साक्ष. आणि तीहि जिवंत रक्ताने, जागत्या मनाने दिलेली. अशी काळाची साक्ष तत्कालीन महत्वाच्या व्यक्तींच्या साध्या व्यावहारिक, नैमित्तिक आणि विशेषतः शासनविषयक पत्रव्यवहारांत स्पष्टपणें दिसून येते. अशा पत्रव्यवहाराला वाङ्मयकृतींचें स्थान देणें कठीण असले तरी वाङ्मयाची व इतिहासाचीं साधनें म्हणून मात्र त्याला फार महत्वाचें स्थान आहे. मराठेशाहींतील अशी तीस चाळीस हजारांच्यावर पत्रें आतां प्रकाशित झालीं आहेत, व त्यांनी तत्कालीन महाराष्ट्राचें अंतरंग स्पष्ट करून दाखवलें आहे. मराठेशाहीतील कित्येक सरदार व मुत्सद्दी स्वतः लेखनकुशल होतेच पण अनेकांच्या पदरीं जलद व मार्मिक लेखकहि होते. अशा मंडळींनी लिहिलेलीं शासनविषयक आज्ञापत्रें, स्वाऱ्यांचीं वर्णनें, युद्धांचे वृत्तांत आज कितीतरी मोलाचे आहेत. त्यांच्या द्वारें काळाचें चित्र उभें राहते, तसेंच त्या त्या व्यक्तींचें दर्शनहि होतें. प्रसंग असेल त्याप्रमाणें या लेखकांनी आपल्या शैलीला धार आणावी, धन्याचा हुकूम जोरदार शद्बांत निवेदन करावा, कोणाला आर्जवाने उपदेश करावा, कोणाचा स्पष्ट निषेध करावा. शिवाजी महाराजांचे फौजेच्या अधिकाऱ्यास पत्र, किंवा त्यांचेंच व्यंकोजीस पत्र, पहिल्या बाजीरावांचें 'पळघाचें पारिपत्य करा' असा आदेश देणारें पत्र, होळकर-शिंदे यांच्या भांडणांत मध्यस्थी करतांना शिंदे यांची कानउघाडणी करणारे नानासाहेब

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पेशव्यांचें पत्र इत्यादि कितीतरी पत्रें वाङ्मयदृष्ट्याहि उत्कृष्ट आहेत. हीं पत्रें व याच काळांतील बखरी यांनी मराठेशाहींतील गद्याला भरदारपणा आणला व त्याला वळण लावलें. मराठे–शाहीच्या अंतानंतर मात्र आपल्याला या जिवंत प्रवाहांचा विसर पडला. अव्वल इंग्रजांच्या ओसाडींत हे जीवनाचे झरे लुप्त झाले आणि तत्कालीन गद्याला त्याचा कांहीच उपयोग झाला नाही. आतां गेल्या ५०–६० वर्षांतील संशोधकांच्या प्रयत्नांनी त्यांना पुनः प्रकाश दिसत आहे.

इंग्रजी राजवटीला प्रारंभ झाल्यावर मराठी वाङ्मयाचें स्वरूप किती बदललें हें सर्वांना ठाऊक आहेच. स्वराज्याच्या विलयाचा धक्का ओसरल्यावर मराठी मनें हळुंहळुं इकडे तिकडे पाहूं लागली. इंग्रजी वाङ्मयाच्या थोडयाबहुत ओळखीनंतर हळुंहळू नवे विचार, नवे वाङ्मयप्रकार उदयास येऊं लागले, नव्या चळवळींना प्रारंभ होवूं लागला. वर्तमानपत्रें, नियतकालिकें निघूं लागलीं, आणि या वर्तमानपत्रांच्या द्वारें एका वेगळयाच प्रकारच्या पत्रवाङ्मयाला प्रारंभ झाला. लोकहितवादींचीं 'शतपत्रें' या नांवानें प्रसिद्ध असलेला संग्रह म्हणजे या प्रकारचें एक विशेष प्रख्यात उदाहरण होय. ही पत्रें अर्थातच कोणा एका व्यक्तीला उद्देशून लिहिलेली नसत. तीं वेगवेगळया नियतकालिकांतुन प्रसिद्ध झालीं. त्यांत वैयक्तिकता मुळींच नसे. तीं केवळ समाजहिताच्या दृष्टीनें व सामाजिक समस्याविषयींच लिहिलेली होतीं. रा. ब. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी, सरकारी कामानिमित्त केलेल्या आपल्या विविध प्रवासांत व सामाजिक जीवनांत जाणवलेल्या अनेक सामाजिक दोषांचें आणि समस्यांचे विवेचन येथें केलें आहे. वर्तमानपत्री लेखांचें किंवा निबंधांचें हें एक प्रारंभीचें स्वरूप. त्यांचा पत्रवाङ्मयाच्या दृष्टीनें उल्लेख करायचें कारण येवढेंच कीं अशा प्रकारचीं सार्वजनिक वा सामाजिक उद्बोधनाच्या दृष्टीनें लिहिलेलीं पत्रें अजूनहि नियतकालिकांत आढळतात. अशा पत्रांचा हळुंहळू एक वाङ्मयीन सांचा बनत चालला. तीं एका विशिष्ट प्रकारच्या वाचकवर्गासाठीं किंवा एका विशिष्ट विषयाच्या विवेचनासाठीं लिहिलीं जाऊं लागली. कधी कधी हीं पत्रें एखाद्या कल्पित व्यक्तीला उद्देशून लिहिलीं जात. त्या पत्रांच्या द्वारें अभावितपणें तिचें व्यक्तिचित्र निर्माण होई, तसेंच पत्रलेखकांचेंहि. परंतु येथे या पत्रांचा मुख्य हेतु अशीं व्यक्तिचित्रें निर्माण करायचा नसतो. एखादा विषय चर्चेला घेण्याचा किंवा जीवनाच्या कांही अंगांचा, जीवनांतील कांही समस्यांचा विचार करण्याचा हेतूच येथे मुख्यतः आढळून येतो. साने गुरुजींचीं 'सुंदर पत्रें', मालतीबाई दांडेकरांचा 'अमोल अहेर' इत्यादि पत्रसंग्रह या प्रकारांत येतील. मालतीबाईनी वेगवेगळे संसार पाहिले, एकेका गृहिणीची एकेक तऱ्हा पाहिली. त्यांच्या चुका त्यांना जाणवल्या, त्यांना जागें करावें, असें त्यांना वाटलें. त्यांच्या उदाहरणांनी इतरांनीहि धडे घ्यावे असें वाटलें, म्हणून त्यांनी काल्पनिक नांवे पण खऱ्या समस्या घेतल्या, व आपल्यापरीनें त्या सोडवून दाखविल्या. त्यांनी म्हटल्याप्रमाणें 'भगिनी वर्गाला' त्यांची ही 'प्रेमाची देणगी' आहे. कवि यशवंतांनीहि आपल्या 'प्रापंचिक पत्रांमध्ये' असाच कांहीसा प्रकार अवलंबिला. त्यांच्या पत्रांत प्रापंचिकताच फार झाली व जिव्हाळा उरला नाही ही गोष्ट वेगळी. जिव्हाळा आणि रसाळपणा, निसर्ग सौंदर्याची जाणीव, आपल्या जुन्या व्रतावैकल्यांच्या रहस्यांची उकल या दृष्टींनी फार आकर्षक वाटणारीं पत्रें साने गुरुजींची. त्यांच्या भोंवतालच्या मुलामुलींचा परिवार खराखुरा आणि विविध प्रकारचा. पत्रांतील नांवें खरी का कल्पित कोण जाणे ? पण लेखन जिव्हाळ्याचें, खऱ्याखुऱ्या मुलांमुलींविषयीच्या आपुलकीने भरलेलें. त्यांच्या जीवनांतलें सौंदर्य दाखवावे. भळभळत्या उद्वेगापासून, निराशांपासून त्यांचें रक्षण करावें, त्यांच्यातील चैतन्याला नीट वाट करून द्यावी या हेतूने साने गुरुजींचा प्रत्येक शब्द स्फुरलेला ! श्रावणाची झिम झिम, फुलांचा सुवास, झरण्यांचा उल्हास, पक्षांचें संगीत, कालिदास – जगन्नाथ ह्यांच्या गोष्टींबरोबरच, वटसावित्री – नागपंचमीच्या कहाण्या, वासुकाका – अंबू आत्यांच्या गोष्टी... सारें कांही एकत्रित होऊन एक गोड, खेळीमेळीचे, स्नेहाळ विश्व साने गुरुजींच्या 'सुंदर पत्रांत' निर्माण झालें आहे.

परंतु पत्रवाङ्मयांतील सर्वांत महत्वाचा विभाग म्हणजे, खऱ्या व्यक्तींना लिहिलेलीं खरी पत्रें. आतांपर्यंत चर्चिलेले विभाग मराठी वाङ्मयांत विशेष पुष्ट आहेत असें नाही. पण हा खऱ्या पत्रांचा विभाग तर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फारच उपेक्षित आहे. आपण पत्र लेखन फार मन:पूर्वक करीतच नाही असें म्हटलें पाहिजे. अधून मधून कुशल वृत्तांतांचीं पत्रें आलीं किंवा गेलीं म्हणजे आपल्यापैकीं बहुतेकांना खूप झालें असें वाटतें. अगदी अद्ययावत् वृत्ति तर ही कीं पत्र आलें नाही म्हणजे सारें ठीक, असें समजावें. जसे म्हणतात ना.... नो न्यूज ईज गुड न्यूज! दूर असलेल्या मुलाने केवळ पैसे लागले म्हणजे कार्ड लिहावीं व उलट वडील मंडळींनीहि 'अभ्यास नीट करावा, प्रकृतीस नीट जपावे' इत्यादि लिहून मोकळें व्हावें. दूर असतांनाहि ज्यांच्यामुळें पूर्ण मन:संवाद रहावा, वास्तवांतले अंतर कापलें जाऊन जीवनांतले धागे एकत्र यावेत, अशीं पत्रें लिहिण्याइतकी संवेदन क्षमता आणि वाणीचें सामर्थ्य फार थोड्या व्यक्तींमध्ये! सामर्थ्यच नसतें असेंहि नसेल. तशी दृष्टि आणि वृत्ति यांचाहि अभाव असावा. आमचे कौटुंबिक संबंध केवळ वरवरचे आणि स्नेहसंबंध औपचारिक! आम्ही जणूं स्वत:च्या अंतरंगांत स्वत:च कधी शिरून पाहत नाही. जें दृष्टीस पडतें, अनुभवास येतें तें कधीं अंतरंगापर्यंत शिरतच नाही. आला क्षण कसा बसा मागे सारून तसेंच कसेंबसें पुढे जाण्याची आम्हांला जणूं घाई–त्यामुळे कीं काय, आम्ही कधी थांबत नाही, कोणत्याहि अनुभवांपुढे थांबून त्याचा आस्वाद घेत नाही. त्याचें मनन करत नाही. आणि दुसऱ्या कोणाला थोपवून, थांबवून त्या अनुभवांचें निवेदन करावें, असेंहि आम्हांला वाटत नाही.

हॅरल्ड लास्की, आणि जस्टीस होम्स् यांच्या पत्र व्यवहारांचे दोन भले मोठे ग्रंथ आपण पाहिले काय? त्या दोन व्यक्तींमध्यें एका पिढीच्या काळाचें अंतर, आणि एका सबंध महासागराच्या स्थळाचें अंतर, परंतु दोन तपाहून अधिक काळपर्यंत त्या दोघांनी जीं जीं पुस्तके वाचलीं त्यांच्या क्रिया–प्रतिक्रिया एकमेकांना कळविल्या. आपापल्या देशांतल्या राजकीय वा सामाजिक घटनांचीं वर्णनें लिहिलीं. आपला सर्व प्रकारचा अनुभव संक्रांत केला. जस्टिस होम्सचें शांत, गंभीर पण हंसरें व्यक्तित्व, हॅरल्ड लास्कीची कटचारी-सारखी बुद्धिमत्ता, प्रचंड व्यासंग, कार्याचा अनंत व्याप, एकीकडे राजकारणाची ओढ आणि दुसरीकडे शांत अध्ययनाचें आकर्षण साऱ्यांचे केवढें जिवंत आणि निर्मळ प्रतिबिंब या पत्रसंभारांत दिसून येते?

इतका विपुल आणि नीटस पत्रसंग्रह आपल्याकडे सांपडणें अशक्यच. अशीं पत्रें लिहिण्याची आपल्याकडे प्रथा नाही आणि अशा आस्थेवाईक प्रकाशनाचीं तर नाहीच नाही. या प्रकारचीं जीं कांही थोडीं पत्रें सांपडतात त्यांची स्थिति पाहून एक प्रकारे कींवच यावी. हरिभाऊ आपटयांनी काशीताई कानिटकरांना लिहिलेलीं पत्रें बहुतेकांच्या परिचयाची आहेत. त्यांचा विस्तार केवळ ११२ पानांचा. ती पत्रें फक्त एकतर्फी, कारण काशीताईंनी त्यांना लिहिलेल्या पत्रांचा, काशीताईंच्यांच शद्बांत सांगायचें म्हणजे 'बहुधा रद्दीत जावून स्नानाच्या पाण्याखाली त्यांचा शेवट झाला असावा.' काशीताईंना हरिभाऊंनी लिहिलेलीं देखील सर्व पत्रें येथे आहेतच असें नाही. परंतु जेवढीं आहेत त्यांत हरिभाऊंच्या स्नेहशील स्वभावाची, वाङ्मयाविषयींच्या कळकळीची किती स्पष्ट साक्ष मिळते! त्यांच्या कादंबऱ्यांत पावलोपावलीं जाणवणारी सामाजिक सुधारणे-विषयीची तळमळ, स्त्रियांच्या परिस्थितीविषयीचा कळवळा आणि स्त्रियांच्या कर्तृत्वाविषयींचा विश्वास किती स्वच्छपणें आढळून येतो. सार्वजनिक व्याख्यानांतून एक आणि आचरणांतून दुसरेंच, कादंबऱ्यांत प्रागतिकपणा आणि घरांत सनातनपणा, असा प्रकार हरिभाऊंच्या व्यवहारांत नव्हता हें स्पष्ट होते. त्यांच्या निर्मळ मन:पूर्वकतेचे आणखी एक प्रत्यंतर पटतें.

हीच गोष्ट विवेकानंदाच्या खाजगी पत्रांची. त्या पत्रांमुळें अमेरिकेंतील तत्कालीन आध्यात्मिक परिस्थितीचे, संसारिक जीवनाचें, स्त्रियांच्या वृत्तीचें ज्ञान तर होतेच पण त्या सर्व पत्रांचे वाचन करित असतांना विवेकानंदाच्या व्यक्तित्वाच्या किती सन्निध गेल्यासारखें वाटतें. त्यांच्या शिष्यांना जितक्या ममतेने ते आपले विचार समजावून देत असतील, त्यांच्या मित्रांना जितक्या आपुलकीने आपले अनुभव वर्णून सांगत असतील तितक्याच स्नेहाळपणें ते आपल्याशी बोलूं लागतात. अनेक विद्वत्ताप्रचुर व्याख्यानांनी आणि तत्त्वविचारपूर्ण निबंधांनी जें कार्य होणार नाही तें या मोकळ्या मन:संवादाने होतें.

याचप्रमाणे, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी, अंदमानच्या अन्धेरींतून लिहिलेलीं पत्रें कोणाच्या परिचयाची नाहीत? आपल्या लहान भावाला उभ्या वर्षांत केवळ एक पत्र लिहावयाची परवानगी त्यांना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मिळाली होती. त्यांत त्यांना आपल्या सर्व आप्त-स्वकीयांची, सहकाऱ्यांची, चौकशी करण्याची मोकळीकहि नव्हती कारण त्यांच्या त्या दुर्धर राजकीय कारावासाच्या अवस्थेंत आपले संबंधी व सहकारी कोण होते हेहि स्पष्ट करणें धोक्याचें होतें. संदिग्ध शब्दांत त्यांनी त्यांना कुशलाचे, प्रेमाचे निरोप द्यावे. लहान भावाच्या अभ्यासाची, प्रकृतीची सर्वतोपरी चौकशी करावी. तशाहि अवस्थेंत शक्य तेवढें त्याचें मार्गदर्शन करावें आणि मग आपल्या प्रकृतीविषयी, मनस्थितिविषयी लिहावें. त्यांचें एकेक पत्र म्हणजे त्यांच्या वर्षभराच्या भावनांचा, अनुभवांचा, चिंतनाचा जणुं निष्यंद, त्यांच्या अविचल धैर्यानें आणि निस्सीम ध्येयवादानें भरलेलें.

सावरकरांचीं पत्रें थोडींच आहेत. सारा पाउणशें पानांच्या आंतला त्यांचा संभार. पण तीं तरी आज प्रकाशित व उपलब्ध आहेत या विषयीं आपण कृतज्ञ असावयाला हवें. वस्तुतः भारताच्या स्वातंत्र्य युद्धाच्या दीर्घकाळांत अशी कितीतरी पत्रें लिहिलीं गेलीं असतील. कितीतरी राजकीय बंद्यांच्या दृढ निश्चयाला, अविचल निष्ठेच्या प्रवाहाला त्या दगडी भिंतींमधूनहि पत्रांच्या रूपानें वाट मिळाली असेल. या पत्रांमधून भारतीय स्वातंत्र्य युद्धाचें खरें मानवी दर्शन होणें शक्य आहे. घटनांची मालिका, कायदेकानूंची सनावली, ऐतिहासिक वर्णनें या सर्वांपेक्षां या पत्रवाङ्मयांतून त्या लढ्याचें जें दर्शन होऊं शकेल त्याचा जिवंतपणा आणि प्रत्ययकारिता कांही वेगळीच राहील. आजच्या स्वातंत्र्योत्तर काळांतहि अशा अनेक व्यक्तींच्या आणि अनेक प्रकारच्या पत्रांचें संकलन व प्रकाशन होणें अत्यंत आवश्यक आहे. तरच हा पत्रवाङ्मयाचा उपेक्षित वाङ्मयप्रकार समृद्ध होईल आणि आपल्या या काळाची मुद्रा मानवी भावभावनांसह उमटली जाईल. "आमच्या गणराज्याची घडण" आणि 'स्नेहाचे झरे' हे आचार्य धर्माधिकाऱ्यांचे दोन पत्रसंग्रह असेच महत्त्वाचे आहेत. भारताच्या गणराज्याचें स्वरूप विशद करणारीं हवीं तेवढीं पुस्तकें मिळतील. परंतु आचार्यांनी लिहिलेल्या या पत्रांमध्ये ही घडण घडवणाऱ्या मंडळींच्या व्यक्तित्वाच्या लहान लहान छटा किती जिवंतपणें सर्वत्र विखुरलेल्या सांपडतात. संसदेंतल्या त्याकाळच्या लहान लहान घटना डोळ्यासमोर उभ्या राहतात. वेगवेगळ्या व्यक्तींच्या भाषणांतल्या लकबा आणि वृत्ति यांची जाणीव होऊन आमच्या लोकांच्या स्वभावाचें चित्र जणूं निर्माण होतें. "स्नेहाचे झरे" या संग्रहानें वाचकाला लेखकाच्या अधिक जवळ, त्यांच्या मित्र परिवारांत, कुटुंबियांत जाण्याची मोकळीक मिळते. त्यांच्या रसाळ गप्पा ऐकण्याची, निर्मळ भाव अनुभविण्याची संधि मिळते. हीं सारीं पत्रें जितकीं मनःपूर्वक तितकींच कुशल. लेखकाच्यात प्रास्ताविक शब्दांत सांगायचें म्हणजे 'वयाच्या चौदाव्या किंवा पंधराव्या वर्षाच्या सुमारास मला पत्रें लिहिण्याचा नादच लागला. अर्थात् हीं पत्रें इंग्रजींत असत. तीं लिहितांना मी अगदी तल्लीन होऊन जात असे; आपलें संपूर्ण हृदय त्यांत ओतीत असे. आणि आपलें सारें भाषाप्रभुत्व प्रकट करीत असें." इतक्या मनःपूर्वकपणें आणि खुलेपणानें लिहिलेलीं पत्रें क्वचितच सांपडतील. दादांना काल्पनिक पत्रें लिहितां येत नाहीत. त्यांचें पत्रलेखन म्हणजे एक सगुणोपासनेचाच प्रकार. प्रत्यक्ष कोणी व्यक्ति मनासमोर असल्याखेरीज आपल्याला पत्रें लिहिण्याची कल्पनाहि करतां येत नाही, असें त्यांनीच सांगून ठेवलें आहे. प्रत्यक्ष व्यक्ति, तिचे स्वतःशीं भावसंबंध, वास्तव जीवनांतील एक खराखुरा क्षण व तत्संबंधी विचार व भावना इतकी सामग्री तयार असल्याशिवाय त्यांचें पत्रलेखन होऊं शकत नाही. या वास्तवाच्या बैठकीमुळेंच त्यांच्या या पत्रांमध्ये जितकी पकड आली आहे, तितकी त्यांना ऐतिहासिकताहि प्राप्त होईल असें वाटतें. उत्तम प्रतीच्या पत्रवाङ्मयांत अपेक्षित असलेले मूलभूत गुण तरी हेच नाहीत कां ?

व्यक्तिजीवनाच्या दर्शनानें त्या त्या काळचें जीवन साकार करणें पत्रवाङ्मयाच्या संकलनानें साधलें जातें. येवढ्यासाठी तरी या उपेक्षित वाङ्मयप्रकाराचें महत्त्व जाणून घ्यायला हवें.

('आकाशवाणी, नागपूर'च्या सौजन्यानें.)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हें...... की...... तें ?

लेखक : पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

आपलें जीवन हें एक कधीहि न सुटणारें कोडें आहे, असें पुष्कळांना वाटतें. हें कोडें सोडविण्याचे, मानवी इतिहासाच्या आरंभापासून केले गेलेले सर्व प्रयत्न असफल ठरले आहेत. आणि ते कालाच्या अंतापर्यंत असफलच ठरत जाणार. कारण कोडें म्हटलें की, तें सोडविण्याची एक गुरुकिल्ली त्यांत अंतर्भूत झालेली असते. ही गुरुकिल्ली जोंवर हातीं लागत नाहीं तोंवर तें कोडें सोडवितां येणें अशक्यच होऊन बसतें.

कोडें जीवनाचें, म्हणून तें सोडविण्याची गुरुकिल्ली जीवनांतच शोधणें अपरिहार्य आहे. जीवनांत म्हणजे कुठें ? कोणाच्या जीवनांत ? आपल्या स्वतःच्या की, दुसऱ्याच्या ? आधुनिक शास्त्रज्ञ म्हणतील, जेथें जेथें जीवन दिसेल तेथें तेथें त्याच्या गुरुकिल्लीचें संशोधन केलें पाहिजे. प्राणी आणि वनस्पति यांच्यांत सजीवता आढळून येते, म्हणून प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र या दोन क्षेत्रांतील संशोधन जीवनाचें कोडें सोडवितांना विचारांत घेणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें मानवाच्या बाबतींत वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र यांच्या जोडीला मानवशास्त्र, शरीरशास्त्र, मानसशास्त्र व समाजशास्त्र यांचेंहि संशोधन विचारांत घेणें अत्यावश्यक आहे.

ही झाली आधुनिक शास्त्रज्ञांची रीत. ही रीत सर्वस्वी बहिर्मुखी आहे. तिला शास्त्रज्ञ 'वस्तुनिष्ठ दृष्टि' असेंहि नांव देतात. शास्त्रज्ञांचें हें जीवनविषयक संशोधन अद्याप चालूच आहे. शे–दीडशे वर्षांपासून तें नांवारूपास येऊं लागलें आहे व तें कधी संपेल व जीवनाचें कोडें मानवास पूर्णतः कधी उलगडेल, याचा अंदाज शास्त्रज्ञांनादेखील देतां येत नाही. सारांश, आज जीं आपण सारीं माणसें जीवन जगत आहोंत, त्यांना आपल्या जीवनाच्या कोड्याबाबत आमरण साशंकच राहावें लागणार.

दुसरी एक दृष्टि

शास्त्रज्ञांच्या या दृष्टीखेरीज जीवनाकडे पाहण्याची आणखी एक दृष्टि आहे. ती सामान्यतः 'अंतर्मुखदृष्टि' या नांवाने ओळखली जाते. आपण सर्व सजीव प्राणी आहोंत. आपल्यापैकी प्रत्येकाला जगाची व जीवनाची जी जाणीव होते ती निसर्गदत्त अथवा ईशदत्त अशा ज्ञानेंद्रियांच्या द्वारेंच होते. ही ज्ञानेंद्रियें नसतीं, तर आपल्याला जगाची व जीवनाची जाणीवच झाली नसती.

दुसरी गोष्ट अशी की, आपल्यापैकी प्रत्येकाला जगाच्या व जीवनाच्या जाणिवेसाठीं आपल्या स्वतः–च्याच ज्ञानेंद्रियांवर सर्वस्वी अवलंबून राहावें लागतें. मी दुसऱ्याच्या डोळ्यांनी पाहूं शकत नाही, दुसऱ्याच्या कानांनी ऐकूं शकत नाही, दुसऱ्याच्या रसनेनें आस्वाद घेऊं शकत नाही, दुसऱ्याच्या नाकानें वास घेऊं शकत नाही, दुसऱ्याच्या त्वचेनें स्पर्शानुभव घेऊं शकत नाही आणि दुसऱ्याच्या मनानें विचार करूं शकत नाही व कसलेंहि ज्ञान मिळवूं शकत नाही. शास्त्रज्ञांनी अथवा इतरांनी जग व जीवन यांच्याबाबत मला कितीहि माहिती दिली, तरी तिचा खरेपणा अथवा खोटेपणा मलाच माझ्या मनाच्या साहाय्याने ठरवावा लागतो. म्हणून जग व जीवन यांच्याबाबत, यांच्या स्वरूपाबाबत व त्यांच्या मला वाटणाऱ्या कोड्याबाबत मला सर्वस्वी माझ्याच निर्णयावर अवलंबून राहावें लागतें. यांतून माझी सुटका नाही. कोणाचीहि सुटका नाही. जगाविषयीं व जीवनाविषयीं मला जें कांही ज्ञान होतें, मग तें माझ्या स्वतःच्या ज्ञानेंद्रियांवर आधारलेलें असो, म्हणजे प्रत्यक्ष असो, वा इतरांनी दिलेल्या माहितीवर आधारलेलें असो, म्हणजे अप्रत्यक्ष असो, त्या ज्ञानाची यथार्थता अथवा अ–यथार्थता ही माझी मलाच, प्रमाणशास्त्रानुसार व माझ्या वैयक्तिक अनुभवानुसार, ठरवावी लागते. यांतून माझी सुटका नाही. कोणाचीहि सुटका नाही. सारांश, जगाविषयी व जीवनाविषयी माझा निर्णय, प्रत्येक व्यक्तीचा निर्णय, हाच माझ्यापुरता व त्या त्या व्यक्तीपुरता अखेरचा निर्णय असतो. या प्रक्रियेंत परावलंबनाला यत्किंचितहि स्थान नाही, ही गोष्ट कटाक्षाने लक्षांत घेणें अत्यावश्यक आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझा निर्णय अथवा इतर कोणत्याहि व्यक्तीचा निर्णय हा जसा बरोबर ठरूं शकतो, तसाच चुकीचाहि ठरूं शकतो. म्हणून, जगाविषयी व जीवनाविषयीं अखेरचा निर्णय घेण्याचा अधिकार जसा माझाच तशीच त्या निर्णयाची अखेरची जबाबदारीहि माझीच. माझा निर्णय यथार्थ असला तर मला त्याचीं चांगलीं फळें मिळतील; अयथार्थ ठरला तर त्याचीं कटु फळें मलाच भोगावीं लागतील. सुख-दुःख हें सर्वस्वी व्यक्तिनिष्ठच, म्हणजे आत्मनिष्ठच असतें.

सारांश, आपल्याला जें जें ज्ञान होतें तें सर्वस्वी आत्मनिष्ठच असतें. आपल्याला जो जो निर्णय प्रत्येक क्षणाला व प्रत्येक प्रसंगीं घ्यावा लागतो तोहि सर्वस्वी आत्मनिष्ठच असतो. आणि आपल्या निर्णयांतून जे बरे-वाईट परिणाम उद्‌भवतात त्यांचीं सुख-दुःखें हीं देखील सर्वस्वीं आत्मनिष्ठच असतात.

जीवनाचे दोन प्रकार

येथवर मी जें सांगितलें तें यथार्थतेने जे ग्रहण करतील त्यांना यापुढे मी जें सांगणार आहे त्याची यथार्थता पटण्यास फारसा त्रास पडूं नये.

जीवन जगण्याचे दोन प्रकार स्पष्टपणें दिसून येतात. एक आंधळा व दुसरा डोळस. जीवन जगण्याचा जो आंधळा प्रकार आहे तोच सामान्यतः सर्व प्राण्यांना लागू आहे. केवळ माणूसच या प्रकाराला कधीं कधीं अपवाद होऊं शकतो. अर्थात् तशी त्याची इच्छा असली व त्यासाठी लागणारी पात्रता अंगीं आणण्याचा त्याने निर्धार केला तर. नाही तर जीवन जगणें हें चालूच आहे. तें कांही आपल्या विचारासाठी व निर्णयासाठी थांबून राहत नाही. विचारासाठी व निर्णयासाठी थांबावें लागतें तें जीवनाला नव्हे, तर आपल्याला, आपल्यापैकी विचार करण्याची इच्छा होईल व निर्णय घेण्याचा धीर होईल त्याला. जीवनाबरोबर जे वाहत जातात आणि विचार करण्याची व निर्णय घेण्याची ज्यांना जरूरच भासत नाही, अथवा भासली तरी तिकडे दुर्लक्ष जे करतात, त्यांचा जीवनप्रकार हा आंधळा जीवनप्रकार होय. या प्रकारांत जीवनाची जाणीवहि आंधळी व म्हणून जीवनहि आंधळें व अंधारलेलें. या जीवनांत, 'जीवन हें काय आहे ?'– असा प्रश्नच निर्माण होत नसल्यामुळे, अथवा निर्माण झाल्यास त्याचें उत्तर प्राप्त करून घेण्याची तीव्र इच्छाच नसल्यामुळे येथें 'जीवनाचें कोडें' या शब्दांना कांही अर्थच उरत नाही.

ज्यांच्या समोर क्षणाक्षणाला, प्रसंगा-प्रसंगाच्या वेळीं कांहीं प्रश्न उभे राहतात व हे प्रश्न सोडविण्याचा एकसारखा ध्यास ज्यांना लागतो त्यांनाच जीवनाचें कोडें जाणवतें. म्हणून जीवनाचा जो डोळस प्रकार आहे तो मूलतः प्रश्नसापेक्ष स्वरूपाचा असतो. या प्रकारांतहि आंधळेपणाचा भाग बराच असतो. कारण मनासमोर केवळ प्रश्न उभा राहणें म्हणजे जीवनांत प्रकाश पडणें नव्हे. प्रश्न उभा राहतांच त्याचें उत्तर शोधण्यासाठीच सारें जीवन जगणें हें डोळस जीवनाचें निर्णायक गमक आहे, एवढेंच. ज्यांना जीवनांतील प्रश्नांचीं यथार्थ उत्तरें प्राप्त होतील त्यांचें जीवन उजळलें जाईल, प्रकाशमय होईल. आणि ज्यांना अशीं यथार्थ उत्तरें प्राप्त होणार नाहीत त्यांचें जीवन उजळलें जाणार नाही. तरी पण प्रश्न उभे राहणें व त्यांचीं उत्तरें शोधण्यासाठीच जीवन जगत राहणें, ही प्रक्रिया ज्यांच्या जीवनांत सुरू होते ते डोळस जीवन-प्रकाराच्या मार्गाला लागले आहेत, असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाही.

प्रश्नसापेक्ष जीवन

डोळस जीवन हें प्रश्नसापेक्ष जीवन आहे. विचारी माणसासमोर जीवनांतील क्षणाक्षणाला अनेक प्रश्न एकसारखे उभे राहत असतात. क्षणाक्षणाला मनासमोर प्रश्न उभे राहणें आणि 'हें करूं की तें ?', 'हें चांगलें की वाईट ?', 'हें सुंदर की असुंदर ?', 'हें सत्य की असत्य ?'–सारांश, 'हें...की...तें ?' अशी समस्या नित्य डोळ्यासमोर नाचत राहणें, हेंच विचारी माणसाच्या जीवनाचें रूप होय. म्हणून, 'हें...की...तें ?'–या, इतर सर्व प्रश्नांना व्यापून टाकणाऱ्या, मूलभूत स्वरूपाच्या प्रश्नांतच जीवनाचें कोडें समग्रतेने अंतर्भूत झालेलें आहे, असें सार्थतेने म्हणतां येतें. जीवनाचें कोडें सोडविण्याची तीव्र जिज्ञासा ज्यांना असेल त्यांना,'हें...की...तें ?' या प्रश्नावरच आपलें सारें लक्ष केंद्रित करणें क्रमप्राप्त आहे.

अस्तित्ववादाचा जनक, कीर्केगार्ड याने या प्रश्नाचें वर्णन मोठ्या मार्मिकपणें केलें आहे. तो

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणतो, 'गळ्याला फास लावून मरावें असें ठरवा; पण लगेच तुम्हाला वाटेल हा शुद्ध वेडेपणा आहे. गळ्याला फास न लावतां जगायचें असें ठरवा; लगेच तुम्हाला वाटूं लागेल, यांत तरी काय अर्थ? गळ्याला फास लावून घेण्याचा निर्णय घ्या, अथवा तो न लावतां जगण्याचा निर्णय घ्या, दोन्ही निर्णय तुमच्या अंतःकरणात विषादाशिवाय दुसरें कांहीच निर्माण करूं शकणार नाहीत. सद्गृहस्थ हो, मानवी शहाणपणाचें सार हें असें आहे!'

या कोंडीतून मुक्त होण्याचा कांहीच मार्ग नाही कां? आहे, एकच मार्ग आहे. कीर्केगार्ड म्हणतो, 'या वज्रकठोर कोंडींतून आपली सोडवणूक करून घ्यावयाची असेल, तर वस्तुनिष्ठतेकडे कायमची पाठ फिरवून निर्धाराने आत्मनिष्ठ होणें व आत्मनिष्ठ दृष्टिकोनांतूनच जीवनरहस्याचा शोध घेण्याची पराकाष्ठा करणें, हाच एकमात्र मार्ग आहे.'

कीर्केगार्डच्या या विधानाचा आशय स्पष्ट होण्यासाठी त्याच्या लिखाणांतील एक उतारा त्याच्याच शब्दांत (इंग्रजी रूपांतरांत) देणें आवश्यक आहे

" My own little 'I' is the only reality I can be sure of. And taking this little 'I' in every one of us as the only reality of which we can be sure, everything else must be related to this 'I'. Everything unknown must be seen in relation to this 'I' to be known and understood. This means turning sharply away from systematization and objectivity to subjectivity, that is to say, to 'inwardness.' It means turning from the 'extensive' life of unexamined sensation to the 'intensive' life of introspection It means turning from the knowledge of general, abstract, and therefore non-real propositions to some sort of non-cognitive grasp of real existent that is, of the individual himself, who is the only real existent for himself, except for the infinite being whom he comes to acknowledge through faith. It means, in a word, turning from tautology to paradox : from systems of impersonal 'truth' that are, because impersonal as superficial and trivial as they are consistent, to the one passionately realized subjective truth that is profoundly meaningful because it is profoundly self-contradictory–because it is absurd from start to finish." (Dreadful Freedom "– By Marjorie Grene.)

तर्कशास्त्राच्या सीमा

कीर्केगार्डच्या वरील उताऱ्यांत तर्कशास्त्रीय भूमिकेचा उल्लेख आहे. त्याचें थोडें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. कोणत्याहि प्रश्नाचें यथार्थ उत्तर प्राप्त करून घेण्याचें साधन म्हणजे प्रमाण. प्रमाणें मुख्यतः दोन प्रकारचीं असतात : प्रत्यक्ष व अनुमान. भारतीय न्यायशास्त्रांत या प्रमाणांचें फारच सूक्ष्म निरूपण केलेलें आढळतें. इतकें की, जे हें प्रमाणशास्त्र पूर्णपणें आत्मसात करूं शकतील त्यांना जग व जीवन यांबाबतच्या कोणत्याहि प्रश्नाचें यथार्थ उत्तर संशोधून काढणें कठीण होणार नाही, असा भारतीय न्यायशास्त्राचा दावा आहे. भारतीय न्यायशास्त्र म्हणजे केवळ तर्कशास्त्र नव्हे. तें एक समग्र दर्शन आहे.

पाश्चात्य तर्कशास्त्र भारतीय न्यायशास्त्राच्या मानाने फारच तोकडें वाटतें. कीर्केगार्डने, तर्कशास्त्रीय भूमिकेवर जो हल्ला चढविला आहे तो पाश्चात्य तर्कशास्त्रीय भूमिकेवरच आहे. कीर्केगार्डचें; म्हणजेच अस्तित्ववाद्यांचें म्हणणें असें की तर्कशास्त्र (Logic) आणि वस्तुनिष्ठता (objectivity) यांची भूमिका 'tautological' आहे. म्हणजे कोणत्याहि प्रश्नाचें यथार्थ उत्तर न देतां ही भूमिका उत्तराऐवजी प्रश्नांतील वस्तु ज्या शब्दांत मांडली गेली असेल त्या वस्तूला उत्तरादाखल एक निराळा शब्द सुचविते. पण हा निराळा शब्द प्रश्नांतील शब्दाशी समानार्थीच असतो.

उदाहरणार्थ, पाश्चात्य तर्कशास्त्रांतील ही विधानत्रयी पहा :

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१) मानव हा मर्त्य आहे.
(२) सॉक्रेटिस हा मानव आहे.
(३) म्हणून सॉक्रेटिस हा मर्त्य आहे.

या तर्कांत नवें असें कांहीच सांगितलें जात नाही. मानव मर्त्य आहे या पहिल्या विधानांत जें सांगितलें गेलें आहे तेंच अनुमान म्हणून दिलेल्या तिसऱ्या विधानांत सांगितलें गेलें आहे. वस्तुत:, मानव मर्त्य आहे या विधानांतच सॉक्रेटिस अथवा इतर कोणत्याहि नावानें ओळखला जाणारा माणूस हा मर्त्य आहे, हें आपल्याला आधींच कळून चुकतें. त्यासाठीं तर्काची म्हणजे अनुमानाची कांहीच आवश्यकता नाही.

म्हणून कीर्केगार्ड म्हणतो की, तर्कानें आपल्याला कोणत्याहि नव्या, पूर्वी अज्ञात अशा नव्या वस्तूचा, म्हणजे नव्या ज्ञानाचा, बोध होत नाही. पूर्वज्ञात अशा एका वस्तूला दुसरें समानार्थीच नाव देणें, हीच तर्कशास्त्राची फलश्रुति. आणि 'वस्तुनिष्ठता' म्हणून जी ओळखली जाते ती तर्कशास्त्रावरच आधारलेली असल्यामुळें तीहि तितकीच अर्थशून्य आहे.

पाश्चात्य तर्कशास्त्राचे मुख्य सिद्धांत म्हणजे

(१) 'क्ष' हा 'क्ष' आहे.
(२) 'क्ष' हा 'अ-क्ष' नाही.
(३) 'क्ष' हा एकाच वेळीं 'क्ष' व 'अ-क्ष' होऊं शकत नाही.

हे सर्व सिद्धांत (?) टॉटॉलॉजिकल स्वरूपाचे आहेत. म्हणजे त्यांच्या आधारावर पूर्वी ज्ञात नसलेल्या नव्या अशा कोणत्याहि वस्तूचा बोधच होऊं शकत नाही आणि म्हणून कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर प्राप्त करून घेण्याच्या कामीं हें तर्कशास्त्र उपयोगीच पडूं शकत नाही.

आत्मनिष्ठा व आत्मसंशोधन

तर्कशास्त्र नाही, तर जीवनांतील प्रश्नाचें उत्तर मिळविण्याचा दुसरा कोणता मार्ग माणसाला उपलब्ध आहे? अस्तित्ववादी उत्तरतात, 'आत्मनिष्ठा (subjectivity); आत्मनिष्ठ दृष्टिकोनांतून, आत्मसंशोधनाच्या (Introspection) साहाय्यानें 'सत्' वस्तूचें दर्शन घेण्याचा प्रयत्न करणें. हा प्रयत्न मूलत:च विरोधाभासी व विरोधविकासी असा आहे. एकच वस्तु एकाच वेळीं 'क्ष' व 'अ-क्ष' अशी असूंच शकत नाही ही तर्कशास्त्राची भूमिका, तर अस्तित्ववादी म्हणतात, 'प्रत्येकाचा आंतरिक अनुभव असा आहे की, एकाच वेळीं आपण चांगले आहोंत व वाईटहि आहोंत, असें नित्य आपल्या प्रत्ययास येतें. किंबहुना, कोणतेंहि विधान करण्याचाच अवकाश की, त्यांत जें निवेदिलें जातें त्याच्या विरुद्ध अर्थाची वस्तूहि तितकीच सत्य असण्याचा संभव प्रत्येक विवेकी माणसाच्या मनाला जाणवल्याशिवाय राहत नाही. मनाचा हा जणुं धर्मच आहे. शिव-अशिव, सत्य-असत्य, सुंदर-असुंदर, अशीं द्वंद्वें एकाच वेळीं, एकाच वस्तूबद्दल मनांत उद्भवूं शकतात. अशा प्रकारच्या कोणत्याहि द्वंद्वांतील एक वस्तु पूर्ण यथार्थ व दुसरी पूर्ण अयथार्थ, असें आपल्याला निश्चयानें म्हणतांच येत नाही. आणि म्हणून एका वस्तूबाबत एकच प्रकारचा निर्णय देण्याचा अट्टाहास करणारें तर्कशास्त्र हें मूलत:च अनुभव-विरोधी व म्हणून अवास्तव असेंच ठरतें.

द्वंद्व आणि निर्द्वंद्व

परस्परविरोधी वस्तूंच्या द्वंद्वात्मक रूपांतच जीवन आपल्या समोर नित्य उभें राहतें. 'हें...की ...तें?' असेंच जीवनाचें प्रश्नात्मक, म्हणजेच द्वंद्वात्मक स्वरूप आहे. या द्वंद्वाचें निराकरण आपल्या आत्म्यांतच केलें जाऊं शकतें. द्वंद्व-निराकरणाचा दुसरा मार्गच निसर्गानें, नियतीनें वा ईश्वरानें आपल्याला उपलब्ध करून दिलेला नाही.

ही वस्तुस्थिति ओळखणें म्हणजेच वस्तुनिष्ठ होणें. आणि वस्तुनिष्ठ होणें म्हणजे संपूर्णत: आत्मनिष्ठ होणें. मानवी जीवन म्हणजे हा असा विरोधाभास (पॅरॅडॉक्स) आहे. जीवनाविषयीं बोलावयाचें म्हणजे विरोधाभासी भाषेंतच बोलणें निसर्गानें क्रमप्राप्त करून ठेवलें आहे. जीवनाची भाषा म्हणजे विरोधाभासाची भाषा.

जे लोक तर्क आणि वस्तुनिष्ठता यांची पूजा करतात, निश्चयात्मक भाषेंत जीवनाचे सिद्धांत प्रतिपादितात आणि या सिद्धांतांच्या पोलादी चौकटींत मानवी जीवन बद्ध करूं पाहतात, ते वस्तुत: जीवन-विरोधी व मानवताविरोधीच बनतात. जीवनाचें स्वरूप निसर्गत: आणि मूलत: द्वंद्वात्मकच असल्यामुळें आणि जीवनांतील द्वंद्वें परस्परविरोधी वस्तूंचीं बनलीं असल्यामुळे जीवनाची भाषा आपातत:च विरोधाभासी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बनते. तिला निश्चयात्मक सिद्धांतांच्या पोलादी चौकटींत बसवूं पाहणें म्हणजे जीवनावर व मानवतेवर क्रूर बलात्कार करणें होय.

मार्क्सवादी व इतर कोणत्याहि प्रकारच्या सर्वाधिकारशाहीची भाषा ही अशी बलात्कारी भाषा होय. ती निसर्गविरोधी, मानवताविरोधी व जीवनविरोधी भाषा होय.

' हें... की... तें ? ' अशा द्वंद्वात्मक स्वरूपांतच जीवन आपल्यासमोर नित्य उभें राहतें. दुसऱ्या कोणत्याहि स्वरूपांत तें आपल्याला जाणवूंच शकत नाही. जीवनाच्या या द्वंद्वात्मक स्वरूपावर दृष्टि केंद्रित करणें आणि ' हें... की... तें ? ' या प्रश्नाचें आत्मनिष्ठ उत्तर देण्याचें धैर्य दाखविणें, हाच जीवनांतील सत्याचें दर्शन घेण्याचा एकमात्र मार्ग मानवाला उपलब्ध आहे. आपल्या सर्वस्वी आत्मनिष्ठ उत्तरांतच जीवनाच्या प्रत्येक द्वंद्वाचें निर्द्वंद्वीकरण अंतर्भूत होत असतें. आपलीं आत्मनिष्ठ उत्तरें अयथार्थ म्हणजे प्रमादशील ठरूं शकतात. पण प्रयत्न, प्रमाद आणि पुन्हा अधिक शुद्ध आत्मनिष्ठ प्रयत्न, हीच जीवनाची निर्द्वंद्वीकरणाची खरी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया अधिकाधिक सखोल, अधिकाधिक शुद्ध आत्मनिष्ठ होत जाणें, हाच अधिकाधिक सुजाण होत जाण्याचा, अधिक ज्ञानवान् होत जाण्याचा आणि म्हणूनच अधिक प्रगतिशील होण्याचा एकमात्र मार्ग आहे. इतर सर्व मार्ग हे जीवनविरोधी, मानवताविरोधी अतएव अवास्तव व प्रगतिविरोधी होत.

व्यक्तिनिष्ठ अशा आत्मनिष्ठेचा मार्ग हाच ज्ञानाचा व प्रगतीचा मार्ग आहे, हें मान्य होतांच, आणि हें मान्य केलें तरच, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, मानवता, सत्य–शिव–सुंदर, इत्यादि जीवनमूल्यांना अर्थ प्राप्त होऊं शकतो, एरव्ही नाही. पूर्वनिश्चित अशा कोणत्याहि तत्त्वांचें संहितीकरण वा सिद्धांतीकरण करून त्यांच्या साच्यांत जीवन बंदिस्त करण्याचे सर्व प्रयत्न, सर्व वाद व सर्व विचार हे जीवनविरोधी, मानवताविरोधी व म्हणून प्रगतिविरोधीच मानले पाहिजेत.

———

एक उद्बोधक लेख

शोषण कीं पोषण ?

लेखक : नी. र. वऱ्हाडपांडे

स्वामी दीनबंधु यांच्या व्याख्यानाला मी एकदां गेलों होतों. हे स्वामी इतर स्वामींसारखे केवळ मोक्षप्रवण व परलोकनिष्ठ स्वामी नसून एकंदर समाजाची आर्थिक व शैक्षणिक स्थिति यांचा कळकळीने विचार करणारे म्हणून प्रसिद्ध होते. व्याख्यानाचा विषय होता 'दरिद्रीनारायणाची पूजा'. व्याख्यानाला हजारों लोक जमले होते. त्यामध्ये मोठमोठे उद्योगपति कारखानदार देखील होते. स्वामींचे विचार ऐकून लोक सारखे टाळ्या वाजवीत होते. व्याख्यान संपल्यावर एक लक्षाधीश कारखानदार व्यासपीठावर उभे राहिले व त्यांनी स्वामींच्या विचाराचा प्रसार करण्यासाठी आणि ते अंमलांत आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या संस्था चालवण्यासाठी एक लक्ष रुपये देणगी देण्याचें जाहीर केलें. त्याबरोबर लोकांनी टाळ्यांचा गजर व 'स्वामी दीनबंधू की जय !' 'शेठ–की जय' वगैरे गर्जना केल्या.

शेठजी आपल्या जागीं बसले व स्वामी पुन: उठून उभे राहिले. ते शेठजींचा गौरव करतील असें साऱ्या लोकांना वाटलें होतें. पण उलट त्यांनी म्हटलें, 'आंताच्या तुमच्या वर्तनावरून माझं सगळं प्रतिपादन फुकट गेलं असं म्हणायला पाहिजे. ऐश्वर्य व सुखोपभोग यांच्यामागे लागल्यामुळे श्रीमंत गरीबांची पिळणूक करतात. असं असतांना गरीबांची पिळणूक करून मिळवलेले एक लक्ष रुपये मी घेईन असं तुम्हाला वाटलं काय ? या पैशाला स्पर्श करणं म्हणजे गरीबांच्या रक्तानं हात विटाळणं आहे. मी ही देणगी साफ नाकारतों ... '

स्वामींचे हे उद्गार ऐकून लोकांना त्यांच्याबद्दलच्या आदराचें आणखीच भरतें आलें व ते स्वामी दीनबंधु जिंदाबाद, शेठ– मुर्दाबाद' म्हणून ओरडले त्याबरोबर स्वामी पुन: खेदाने म्हणाले,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'लोक हो ! माझं दुर्दैव की माझ्या सांगण्याचा तुमच्यांवर कांहीच परिणाम होत नाही याचा तुम्ही पदोपदीं प्रत्यय आणून देत आहां. गरीबांची पिळणूक हें जसं पाप आहे त्याचप्रमाणे श्रीमंतांचा द्वेष हें देखील पाप आहे. श्रीमंतांचा द्वेष केल्यानं त्यांना महत्त्व दिलं जातं. उलट त्यांच्याबद्दल क्षमाशील राहिल्यानं त्यांचा नैतिक हीनपणा अधिक स्पष्ट होतो. म्हणून श्रीमंतांचा द्वेष न करतां आपण त्यांच्यावर दया केली पाहिजे—'

स्वामींचें हें बोलणें ऐकून लोकांना आणखीच भक्तीचा उमाळा आला व ते 'स्वामी दीनबंधु जिंदाबाद' म्हणून ओरडले. मात्र यावेळीं त्यांनी शेठजींना लागतील असे शब्द न उच्चारण्याची दक्षता बाळगली.

स्वामीच्या व्याख्यानाचा कार्यक्रम संपल्यावर लोक पांगू लागले. व्याख्यानाच्या प्रसंगीं झालेल्या प्रकारावरून आपल्या समाजांत प्रचलित असलेल्या मूल्यकल्पनांबद्दल माझ्या मनांत विचार घोळूं लागले. आपल्या समाजांत एखाद्या संताला योरविभूति समजण्यांत येऊ शकते. लढाया मारणारा एखादा योद्धा लोकांच्या आदराला व प्रेमाला पात्र होऊ शकतो. उत्कृष्ट अभिनय करणारी एखादी नटी देखील आज लोकप्रियतेचा उच्चांक गाठू शकते. पण मोठमोठे कारखाने उभारून देशाची औद्योगिक भरभराट होण्यास मदत करणारा एखादा उद्योगपति मात्र कधीच लोकप्रिय होत नाही. फेरीवाल्याच्या कामापासून आरंभ करून एखादा पुरुष कोट्यावधी किंमतीच्या कारखान्यांचा मालक झाला तर एखाद्या मासिकांत फार तर त्याच्यावर एकदोन रकाने लेख येईल. पण त्याला पहायला झुंडी लोटणार नाही. तो एखाद्या योद्धयासारखा किंवा एखाद्या शास्त्रज्ञासारखाच आदरास पात्र आहे असें कुणालाच वाटत नाही. याचे कारण स्वामी दीनबंधूनी केलेल्या शेटजींच्या अवहेलनेत व्यक्त झाले आहे. उद्योगपति गरिबांना मजुरीला लावतो. त्यांना फक्त पोटापुरती मजुरी देतो. व त्यांनी निर्मिलेले सर्व धन स्वतः लुबाडून श्रीमंत होतो अशी स्वामी दीनबंधूंची समजूत होती. स्वामी दीनबंधूप्रमाणेच अर्थशास्त्राचा विशेष विचार न करणाऱ्या सर्व लोकांची अशीच समजूत असते.

पण थोडासा विचार केल्याबरोबर समजूत किती चुकीची आहे हे कळायला उशीर लागत नाही. आपण असें समजूं की, एखाद्या कारखान्यावर शंभर रुपये उत्पन्न होते. यापैकी वीस रुपये मजुरांना दिले जातात. वीस रुपये यंत्रसामुग्रीवर वगैरे खर्च होतात. व उरलेले साठ रुपये कारखानदार स्वतः घेतो. आता हे साठ रुपये कारखानदाराने वस्तुतः मजुरांच्या हक्काचे असून लुबाडले व त्यांना नागवून तो श्रीमंत झाला हे म्हणणें कितपत खरे आहे, हे पाहायचे असेल तर या साठ रुपयांचे तो काय करतो हे पाहिले पाहिजे.

कारखानदार महत्वाकांक्षी असेल तर तो हे साठ रुपये गुंतवून दुसरा एखादा उद्योग उभा करील व आपल्या उत्पन्नाची साधनें वाढविण्याचा प्रयत्न करील. आज कापडाच्या गिरणीवर नफा झाला तर तो ज्या नफ्यावर एखादी कागदाची गिरणी उभी करील, किंवा कापडाचीच दुसरी एखादी गिरणी काढील. म्हणजे कारखानदाराने घेतलेले साठ रुपये हे त्याच्या खिशांत जातात हे खरे असले तरी ते तेथून लवकरच बाहेर येतात. व त्याच्या नवीन गिरणीचें यंत्र तयार करणाऱ्या व तिच्यांत काम करणाऱ्या नव्या मजुरांना मिळतात. उद्योगपतीने एक उद्योग यशस्वी केला की दुसरा उद्योग हातीं घेण्याचें सामर्थ्य त्याला येतें. या नवीन उद्योगांत काम करणाऱ्या लोकांमध्ये त्याने मिळवलेलें धन वाटलें जात असतें.

अशा रीतीनें नवीन उद्योग उभारतांना वाटलें जाणारें धन, नुसतें दान करून वाटल्या जाणाऱ्या धनापेक्षा कितीतरी जास्त समाजोपयोगी असतें कारण दानद्वारां झालेली वाटणी अनुत्पादक असते. भिकाऱ्याला पैसा दिल्याने समाजांत नवीन संपत्ति कोणतीच निर्माण होत नाही. उलट कागदाच्या गिरणींत काम करणाऱ्या मजुराला पैसा दिल्याने कागद निर्माण होतो व समाजाच्या संपत्तींत भर पडते. महत्त्वाकांक्षी उद्योगपतीला मिळणारा नफा याप्रमाणें उत्पादक कामांत खर्च होतो. त्यामुळे धनाची आपोआप वाटणी होते व नवीन संपत्ति निर्माण होऊन समाज जास्त समृद्ध होतो.

उद्योगपति महत्त्वाकांक्षी नसेल तर त्याला मिळालेला नफा तो चैनींत खर्च करील. पण चैनींत खर्च केलेला पैसा देखील अखेर समाजांत वाटलाच जातो. समजा एखाद्या चैनी उद्योगपतीने स्वतःसाठी एक मोठा महाल बान्धला, त्यांत एक सुन्दर बाग

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बांधली,आंत खास स्वत:साठी एखादें रंगमंदिर बांधलें व तेथें संगीत, नृत्य वगैरेंचा आस्वाद घेण्यांत तो वेळ घालवूं लागला, तर त्याचा पैसा महाल बान्धणारे मजूर, बाग फुलविणारे माळी व गायक, नर्तिका इत्यादी कलावन्त यांच्यांत वाटला जाईल. म्हणजे चैन करण्याखेरीज पैसे मिळवण्यांत ज्याचा कोणताही उद्देश नाही अशा श्रीमन्ताचा पैसा देखील समाजांत सारखा वाटलाच जात असतो. त्यामुळे श्रीमन्तांची श्रीमन्ती हें गरीबांच्या गरीबीचें कारण आहे हें म्हणणें निखालस खोटें ठरतें. असें म्हणणाऱ्या लोकांना अर्थ-व्यवहाराचें विशेष ज्ञान नसतें असें म्हटलें पाहिजे.

पैसा ही एक पाण्यासारखी प्रवाही वस्तु आहे. तो सारखा इकडून तिकडे जात असतो. म्हणूनच त्याला 'चलन' म्हणतात. पैशाच्या या इतस्ततः भ्रमणामुळे नवीन सम्पत्ति निर्माण होते व समाज समृद्ध होत जातो. त्यामुळे उद्योगपतीने जास्त पैसे मिळवले म्हणून बाकीचा समाज त्या मानाने गरीब झाला असें म्हणणें हास्यास्पद आहे. उलट देशांत जेव्हा उद्योगधंद्यांची भरभराट होऊन उद्योगपति जास्त जास्तच संपन्न होऊं लागतात तेव्हा समाजांतील गरीब लोकही जास्त जास्त संपन्न होऊं लागतात असें अर्थ-शास्त्राचे इतिहासकार सांगतात.[1] उद्योगपतींची श्रीमंती दुसऱ्याचें धन लुबाडल्यामुळे जमली असती तर जितक्या प्रमाणात ते श्रीमंत झाले तितक्याच प्रमाणांत गरीब लोक आणखी गरीब होत गेले असते. असें न होतां औद्योगिकरीत्या भरभराटलेल्या देशातील सामान्य माणूस मोटार बाळगू शकतो. त्यावरून पिळ-वणकीची कल्पना कपोलकल्पित ठरते.

पिळवणुकीची कल्पना सिद्ध करण्यासाठी आणखी एक युक्तिवाद करण्यांत येतो. तो असा की, समाजांत गरीब व बेकार कामगार नसले तर उद्योगपतीला कामगारांना कामाला लावण्यासाठी ज्यास्त वेतन द्यावे लागेल. म्हणून समाज गरीब रहावा व आपल्याला कवडी किंमतीत मजूर मिळावे म्हणून उद्योगपतींची धडपड सुरू असते. हा युक्तिवाद आपल्या पायांना जास्त वजन सांभाळावे लागू नये म्हणून प्रत्येकजण स्वत:ची उपासमार करून रोड होण्याचा प्रयत्न करतो असें म्हणण्यासारखा हास्यास्पद आहे. पौष्टिक आहार करून स्वत:चे वजन वाढले तरी त्यामुळे सर्वच शरीर जास्त सुदृढ होऊन पायांची शक्तीहि वाढते व परिणामीं पौष्टिक अन्न खाणेच हितावह ठरते. त्याचप्रमाणे संपन्न समाजांत मजुरांना जास्त मजुरी द्यावी लागली तरी त्यांनी बनविलेला माल फार लवकर खपतो. कारण मजुराप्रमाणेच गिऱ्हाईकहि संपन्न असतात– म्हणून समाज संपन्न असणेच उद्योगपतींच्या दृष्टीने हितावह असते.

या तत्वाच्या स्पष्टीकरणार्थ वेल्सनें आपल्या 'मानवाचे काम संपत्ति व सुख'[2] या ग्रंथांत हेन्री फोर्ट या उद्योगपतीचे उदाहरण दिले आहे. फोर्टचे म्हणणे असें आहे की समाजाच्या एकंदर समृद्धीवरच उद्यो-गपतींची भरभराट अवलंबून असल्यामुळेच समाजाची समृद्धि वाढविणें हे उद्योगपतीच्या स्वार्थाच्या दृष्टिने देखील आवश्यक ठरते. या तत्वाबरहुकूम जेव्हा जेव्हा आपला माल पुरेसा खपत नाही असें फोर्टला दिसून येत असे त्यावेळी तो आपल्या कामगारांचे वेतन वाढवी. व मालाची किंमत कमी करी असें केल्यामुळे समाजाची क्रयशक्ति वाढून फोर्टच्या मालाचा लवकर उठाव होई, व स्वस्त किंमत जास्त वेतन यामुळे सुरवातीला झालेला तोटा भरून निघून त्याला अतोनात फायदा देखील होत असे. फोर्टच्या या उदाहरणावरून समाजांत गरिबी कायम ठेवण्यात उद्योगपतीचे हित असते हे म्हणणे किती निर्बुद्धपणाचे आहे, हे दिसून येते.

पण हें दिसून यायला फोर्डपर्यंत जाण्याची वस्तुतः जरूर नाही. मन्दीच्या काळांत बेकारी माजते व उद्योगपतींना मालाला पुरेसें गिऱ्हाइक न मिळाल्या-मुळे आपले उद्योग आखडते घ्यावे लागतात; त्याच-प्रमाणे तेजीच्या काळांत बेकारी नाहीशी होते व गिऱ्हाइकांच्या झुंडी मालावर धावल्यामुळे उद्योगपति आपले उद्योग जोराने वाढवूं लागतात हा अनुभव सार्वत्रिक आहे. वेतन ज्या प्रमाणांत वाढते त्यापेक्षा किंमती फारच मोठ्या प्रमाणांत वाढतात. त्यामुळे वेतनवाढ ही शेवटी विक्रेत्याला उपकारकच ठरते.

---

१. History of Economic Doctrines by Gide & Rist पहा.

२. Work, Wealth & Happiness of Mankind, by H. G. Wells.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उद्योगपति श्रमजीवी वर्गाला लुबाडूनच श्रीमंत होतो या द्वेषमूलक अन्धश्रद्धेचा पगडा मनावर बसल्यामुळे आणखी एका ब्रम्हघोटाळी कल्पनेचा उदय झाला. ही कल्पना म्हणजे अतिरिक्त मूल्याची कल्पना. कल्पना जितकी भोंगळ तितकीच ती संदिग्ध व अनिश्चित शब्दांत मांडणें पथ्यावर पडतें. नाही तर ती मांडल्याबरोबरच तिचा खोटेपणा उघड होतो. त्यामुळे या कल्पनेच्या विवरणाला फारच गूढगूंजनी स्वरूप आलें आहे व तिची स्पष्ट शब्दांत मांडणी करणें कटीण होऊन बसलें आहे. तरी तिचा गर्भितार्थ असा सांगतां येईल की उद्योगपति मजुराला जी मजुरी देतो तिचें मूल्य मजुराला जेमतेम जीवन्त व मजुरी करण्यास समर्थ राहण्यास ज्या वस्तूंची आवश्यकता आहे त्यांच्या मूल्यापेक्षा कमी असते. म्हणजे मजुराला लागणारें अन्न, वस्त्र व छप्पर हीं निर्माण करण्यांत जेवढें मूल्य खर्च होतें त्यापेक्षा त्याला मिळणाऱ्या मजुरीचें मूल्य कमी असतें. या दोन मूल्यांत असणाऱ्या फरकाला 'अतिरिक्त मूल्य' असें म्हणतात. हें अतिरिक्त मूल्य उद्योगपति लुबाडतो.

मूल्य या शब्दाचा कांहीतरी गूढ व आध्यात्मिक अर्थ केल्याशिवाय वरील विधानाचा वदतोव्याघात दूर होणार नाही. मजूर ज्या वस्तूंचा वापर करतो त्यांचें मूल्य जर त्याला मिळणाऱ्या मजूरीच्या मूल्यापेक्षा कमी असतें तर त्याला त्या विकत कशा घेतां येतात? की उद्योगपतीप्रमाणेच मजूरही कमी मूल्य देऊन जास्त मूल्याची वस्तु विकत घेतो? उद्योगपति जसा मजूराला लुबाडतो त्याचप्रमाणे मजूरदेखील शेतकऱ्याच्या श्रमांचें अतिरिक्त मूल्य लुबाडतो कीं काय? तसेंच मजुराने वापरलेल्या वस्तूंचें मूल्य आणि त्याच्या मजूरीचें मूल्य मापायचें कसें? असे अनेक प्रश्न विचारूं लागल्याबरोबर अतिरिक्त मूल्याच्या कल्पनेच्या चिंधड्या उडतात.

अर्थशास्त्राचा थोडासा कवडसा पडल्याबरोबर धुक्यासारख्या विरून जाणाऱ्या 'पिळवणूक' "अतिरिक्त मूल्य' वगैरे कल्पना निर्माणच कशा झाल्या? व निर्माण होऊन इतके दिवस अनेक सुबुद्ध लोकांच्या मनावर त्यांचा पगडा कसा राहिला? याचे उत्तर शोधूं जाता मानवी श्रद्धा, बुद्धि व अनुभव याप्रमाणेंच त्याच्या भावनावरहि किती मोठ्या प्रमाणांत अवलंबून असतात हे स्पष्ट होते. उद्योगपतीच्या संपत्तीचा इतर लोकांना साहजिकच मत्सर वाटतो. व त्याची संपत्ति आपल्याला लुबाडून मिळवलेली आहे ही कल्पना या मत्सराला पोषक असते. मत्सराला पोषक असलेली कल्पना शास्त्र व बुद्धिवाद यांच्या नांवाखाली मांडली गेली की तिचा पगडा मनावर सहज बसतो व मग कितीहि बलवत्तर प्रमाणें पुढे केली तरी त्यांना ती जुमानत नाही.

निर्मत्सर मनाने विचार केला तर समाजाची आर्थिक भरभराट घडवून आणण्यांत उत्पादक यंत्रें निर्मिणाऱ्या शास्त्रज्ञांच्या खालोखाल त्यांचा कुशलतेनें वापर करून समाजाची संपत्ति वाढवणाऱ्या उद्योगपतीचे महत्व आहे. उद्योगपतीच्या धडपडीमुळे हजारो लोक अन्नाला लागतात. या दृष्टीने स्वामी दीनबंधूसारख्या नैतिक प्रवचनें देत फिरणाऱ्या पुरुपापेक्षा त्यांनी धिक्कारलेल्या शेटजींचे महत्व कितीतरी जास्त आहे. शेटजींचे उद्योग थांबले तर हजारो लोक अन्नाला मोताद होतील. उलट स्वामी दीनबंधूंचा चरित्रक्रम थांबला तर कोणाचेहि नुकसान होणार नाही. असें असतां दीनबंधूसारख्या पुरुपाने शेटजींना कमी लेखावे व खालच्या नैतिक पातळीवरचा माणूस म्हणून त्यांची कींव करावी, हा आपल्या समाजाच्या उरफाट्या मूल्यकल्पनांचा परिणाम आहे.

या उरफाट्या मूल्यकल्पना त्यागाविषयीच्या आहेत. माणूस त्याग किती करतो यावर आपल्या समाजांत त्याचे श्रेष्ठत्व अवलंबून असते. तो समाजाचे कल्याण किती करतो यापेक्षा तो स्वतःचे नुकसान किती करतो याला आपल्या दृष्टीने जास्त महत्व आहे. स्वामी दीनबंधू साधें कपडे घालतात, त्यांनी लग्न केले नाही, ते झोपडीत राहतात म्हणून समाजाच्या दृष्टीने ते शेटजींपेक्षां श्रेष्ठ. कारण शेठजी महालांत राहतात, त्यांची बायको रूपवती आहे, ते मोटारींतून व विमानातून हिंडतात! त्यागाशिवाय समाजकल्याण होत नाही असें मानलें तर राजदरबारीं ऐश्वर्यांत लोळणारा कालिदास व स्वपराक्रमाने राजा झालेला श्रीकृष्ण हे समाजाचें कल्याण करणारे थोर पुरुष नव्हते असें म्हटलें पाहिजे.

उद्योगपति लोकांना रोजगार देतो म्हणजे काय त्यांच्यावर उपकार करतो? असें जेव्हा विचा-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रण्यांत येतें तेव्हा परोपकाराशिवाय समाजाचें हित होऊं शकत नाही असें तत्व गृहीत केलें जातें. वस्तुत: समाजांतलें फारच थोडें सुख परोपकारावर अवलम्बून आहे. दांत कोरून ज्यांप्रमाणे पोट भरूं शकत नाही त्याप्रमाणे परोपकारांवर समाज चालूं शकत नाही. समाजाची भरभराट ज्या स्वार्थी उद्योगांनी समाजाचा देखील फायदा होतो अशाच उद्योगावर अवलंबून आहे. कालिदासानें परोपकार करण्यासाठी काव्यें लिहिलीं नाहीत, तर स्वतःच्या प्रतिभेच्या विलासांत त्याला अपरिमित आनन्द होत होता म्हणून. शास्त्रज्ञांनी शोध लावले ते समाजोपकारासाठी नसून त्यांच्या बुद्धीच्या विलासातून ते निघाले. त्याचप्रमाणे उद्योगपति स्वतः श्रीमंत होण्यासाठीच उद्योग उभारतो. पण असें असूनही कालिदासाच्या काव्यांनी हजारो लोकांना आनन्द होतो; शास्त्रज्ञांच्या शोधांनी जगांतली समृद्धि व सुख वाढतें नि उद्योगपतींच्या उद्योगाने लोकांना व्यवसाय मिळून समाजांतली संपत्ति वाढते. म्हणून उद्योगपतींचें महत्व शास्त्रज्ञ व कवि यांच्या मानाने कोणत्याही रीतीने कमी नाही.

कै. सानेगुरुजी

इतिहासाचार्य राजवाडयांनी एकदां असें लिहिलें होतें कीं, जनतेच्या दुःखांबद्दल लेखकांच्या मनांत जोपर्यंत गाढ सहानुभूति निर्माण होत नाही, त्यांची दैन्यावस्था पाहून मन कढत नाही, उकळत नाही तों पर्यंत तो कसलें वाङ्मय निर्माण करणार? त्याच्या हातून रद्द काव्यें, रद्द कादंबऱ्याच निर्माण व्हायच्या. गुरुजींच्या पुस्तकांना लाभलेल्या लोकाश्रयाचें मर्म पूर्वसूरींच्या रुक्ष ग्रंथात न पाहतां तें सामाजिक भावनांच्या अंतरंगांत शिरून धुंडाळण्याचा यत्न केला तर, या जराजर्जर व गलितगात्र दिसणाऱ्या समाजाच्या देहांत एका नवीन भावनेचा, ननीन चैतन्याचा कोंभ पालवूं लागला आहे असें आढळून येईल. आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयाचा इतिहास लिहितांना जनतेसाठीं आपलें अंतःकरण पिळून लिहिणारा एकच एक सारस्वत म्हणून गुरुजींचें नांव लिहावें लागेल.

— ना. ग. गोरे.

विदर्भांतील कांहीं लोकगीतें

सौ. कमलाबाई सुरडकर

'युगवाणी'च्या जुलै ५४ च्या अंकांत श्री. ना. रा. शेंडे यांनी 'विदर्भांतील कांही लोकगीतें' संकलित केलेली आहेत. हीं गाणीं मी माझ्या सासूबाईंच्या प्रेमळ मुखांतून किती तरी वेळां ऐकलीं आहेत व त्यांची अवीट गोडी चाखली आहे.

माझ्या सासूबाईंचें माहेर मलकापूर तालुक्यांतील शेलगांव–बाजार हें गांव आहे. आमचें सासर खानदेशांतील जामेनर तालुक्यांत आहे. तेव्हा ह्या गीतांत विदर्भ आणि खानदेश ह्यांचें चित्र प्रतिबिंबित झालेलें आहे.

(१) वऱ्हाड आणि खानदेशांत 'ळ' ह्या शब्दाला 'य' म्हणून उच्चारतात. जसें गुळ–गुय, दाळ–दाय, मुळ–मुय

(२) 'व' ऐवजी 'य' म्हणतात. जसें वेचणे–येचने

(३) 'ण' ऐवजी 'न' म्हणतात. जसें वेचणे–येचने.

(४) 'मला' ऐवजी 'मले', 'तुला' ऐवजी 'तुले'

(५) 'माझ्या', ऐवजी 'माह्या' 'तुझ्या' ऐवजी 'तुह्या'

हें लक्षांत घेऊन आपण खालील लोकगीतांतील सौंदर्य–स्थळें पाहूं.

वारा–वाहादन झाडाले नाही पान ।
जंगलच्या पाखराचं उदास झालं मन ।।

अर्थः–भयंकर वादळामुळें सर्व झाडें पर्णहीन झालीं आहेत. कुठेंच छाया नाही, हिरवळ नाही. त्यामुळे जंगलांतील पक्षी अगदीं उदास होऊन बसला आहे.

हीं निसर्गगीतें रूपकात्मक आहेत. यांत एका दुःखी सुनेचें जीवन रंगविलें आहे. सासूचा जाच, नणदेच्या टोचण्या, पतीराजांची मारहाण, इत्यादि लहान लहान संकटाचें एक भयंकर वादळ उठलें आहे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व त्यांत सहानुभूति दाखविणारा कुटुंबांत एकही माणूस नाही. अशावेळेला सुनेची मनःस्थिति उदास पांखराप्रमाणें होत असल्यास काय नवल ! ह्यांतील 'वारावाहादन' हा शद्ब फारच अर्थपूर्ण आहे. 'वारा-वाहादन' म्हणजे भयंकर वादळ. भयंकर वादळ म्हणजे पुष्कळशा वाऱ्यांचें एकत्रीकरण. वाऱ्यांना पाठीवर हेवाहवून घेऊन जाणारा असें वादळाचें वर्णन आ.

धों धों पडणाऱ्या पावसाचें खालील शद्बचित्र पहा.

'पानी पावसाच्या मोकलल्या धारा
कदंबाच्या झाडाखाली तिफना उभ्या करा'

अर्थः–पावसाच्या सरीवर सरी कोसळत आहेत. तेव्हां कदंबाच्या झाडाच्या आश्रयाने शेत पेरणाऱ्यांनो उभे राहा असें कवयित्री सांगत आहे. 'तिफन' म्हणजे 'पांबर' किंवा बीं पेरण्याकरितां तयार केलेली लाकडाची वस्तू.

'सेताच्या बंदानं पपुया राजा बोले
दिस पेरणीचे आलें'

अर्थः–शेताच्या किनाऱ्यावरील झाडावर पपया पक्षी पेरते व्हाऽऽ पेरते व्हाऽऽ हा शद्ब सारखा गातो. हा पक्षी फक्त पेरणीच्या दिवसांतच गातो. ह्याला बोल फुटले म्हणजे पेरण्या उठल्याच म्हणून समजा. हा पक्षी सहसा कोणाच्या दृष्टोत्पत्तीस येत नाही. ह्याच्याबद्दल कविकल्पना आहे कीं, हा पक्षी गाईच्या खुरांत पाणी पितो व मग त्याला बोल फुटतात.

पानीइ पडतो डोंगर वला होतो
गाईच्या खुरांत पपया पानी पितो

अर्थ :– " पाऊस पडायला लागला आहे. त्यामुळे डोंगर ओलाचिंब झाला आहे. जवळच चरत असलेल्या गाईचीं चिखलांत खुरें उमटलेलीं आहेत. त्यांत पाणी सांचलें आहे. तेंच पाणी पपया पितो व गात सुटतो." हा पक्षी फक्त गाईच्या खुरांतलेंच पाणी पितो. एऱ्हवीं तो पाणी पीत नाही अशी लोककल्पना आहे.

खालील गीतांत निसर्गाचें बहारीचें वर्णन आहे.

'पानी पाऊस उठला काया कोट
धरतरी माता नेसली हिरवा जोट'

अर्थ :– आकाशांत काळेकुट्ट ढग जमले आहेत. जमीनीवर सृष्टिमाता हिरवीं वस्त्रें परिधान करीत आहे.

" मेघ नवरदेव इजा वऱ्हाडनी
त्याहीच्या जोरानं नद्या चालल्या भरूनी "

अर्थ :– ढग आलेले आहेत. विजा गरजत आहेत. पाऊस पडतांच नद्या तुडुंब भरून जात आहेत.

पाऊस पडतांच जिकडे तिकडे आनंदी आनंद पसरतो. कवयित्रीचें कोमल हृदय नाचूं लागतें. व हर्ष निर्माण करणाऱ्या पावसाला आर्जवितें.

" पड पड पाण्या येऊं दे भाजीपाला
दुवया म्हणतो मायबाप आला "

अर्थ :– हे पावसा ! खूप वर्षाव कर. भाजीपाला फुलूं दे. कारण गरीब लोक तुला आईबाप म्हणून संबोधितात.

खालील गीतांतून कवयित्री किती मोठा आशय जगापुढें मांडतात–

" कापूस येचूनी परखाटी झाली सुनी
कोनाचं नाही कोनी समज धरा मनी "

अर्थ :– कापसाच्या झाडांतून कापूस वेचल्या-नंतर झाड कापूसहीन म्हणजे सुनें पडतें आणि त्यानंतर त्याचेजवळ कोणीच जात नाही. ह्यावरून हेंच सिद्ध होते कीं, कोणीच कुणाचं नाही.

श्लेष अलंकाराचें खालील गीत पहा.

" वलांड्याच्या शेती जागले जागले
भावाच्या शेतामंधी मोती कनसाले लागले "

अर्थ :– माझ्या भावाचें शेत दुसऱ्याच्या शिवेंत आहे. त्यांत कणसांना भरगच्च मोती लागलेले आहेत. व त्याच्या रक्षणासाठीं जागले लोक जागत आहेत." ह्यांत 'जागले जागले' शद्ब आले आहेत. पहिल्याचा अर्थ आहे 'संरक्षक' (Watchman) वा कोतवाल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुसऱ्याचा अर्थ आहे : जागला करीत आहे म्हणजे संरक्षक संरक्षण करीत आहे

खालील गीतांचा अर्थ असा आहे:—

'तुझ्या जिवासाठीं घार गंगनाची व्हईन
पर पक्षाचे लाईन तुह्या भेटीले येईन'

अर्थ:— तुझ्या जीवासाठीं आकाशांतली घार होईन, पक्षांचे पंख लावीन व तुझ्या भेटीस येईन.

'तुझ्या जीवासाठीं गंगनाची व्हईन घार
लागीन उनवारा माह्या सावलीन चाल'

अर्थ:—तुझ्या जीवासाठीं आकाशांतील घार होईन आणि तुला ऊनवारा लागूं नये म्हणून तूं माझ्या पंखांच्या खालून चाल.

'तुझ्या जीवासाठीं व्हईन जंगलची चिमनी
मायच्या मयांत तूं बाग मी निंबोनी'

अर्थ:— तुझ्यासाठीं मी जंगलची चिमणी होईन किंवा बागवानाच्या मळ्यांत तूं प्रत्यक्ष बगीचा हो व मी लिंबाचें झाड होईन.

हीं गाणीं सासरी गेलेल्या मुलीचें शब्दचित्र रेखाटतात. ती भावाला भेटण्याकरितां इतकी उतावीळ झाली आहे कीं,त्याच्यासाठीं ती पक्षाचं रूप घ्यायला तयार आहे.

भावाकरितां बहीण किती त्याग करण्यास तयार आहे हें खालील गीतावरून स्पष्ट होईल:—

'तुझ्या जीवासाठीं जीव देईन मोपला
भाऊ माहा चापा नवतीचा एकला
तुझ्या जीवासाठीं देईन मी जीव
खाली तुह शीर वरति माही मान

अर्थ:—हे चाफ्यासारख्या एकुलत्या एक भावा, तुझ्यासाठीं मी माझा (मोपला) जीव द्यायला तयार आहे. प्रसंग आला तर खाली तुझं डोकं व वरती माझी मान देईन. भाऊ वहिणींतील प्रीतीचें, त्यागाचें किती सुंदर व उदात्त वर्णन आहे !

सासुरवासाच्या जाचांत सांपडलेल्या असहाय्य मुलीचें कारुण्यानें ओथंबलेलें हें हृदयाला चटका लावणारें गीत पहा:—

'बोलणीच्या पायीं मन इटलं किटलं
वाऱ्याच्या सुतानं पान केइच फाटलं'

अर्थ:—सासू व नणंदेच्या शाब्दिक त्रासांनी मन कसं विटून गेलं आहे. माझी स्थिति म्हणजे वाऱ्यानं फाडलेल्या केळीच्या कोमल पानासारखी झाली आहे.

'सासुचा सासुरवास सरपाची लह्यर
नंदेचा सासुरवास इचा मांडला कहर'

अर्थ:—सासूचा सासुरवास म्हणजे सापाचें चावणें. व नणंदेचा त्रास म्हणजे विंचवाचें चावणें. पहिल्या त्रासानें सून मेल्यासारखी होते व दुसऱ्या त्रासानें नुसतीं अंगाची लाही लाही होते.

शेवटीं कंटाळून सून म्हणते कीं, माझेहि दिवस येतील.

'नको बोलू नारी याहून त्याहून
वाघाचं आहे पिलू डाव घेईन राहून'

अर्थ:—अग, उगीच वहाणा करून छळूं नकोस. मी सुद्धां वाघाची मुलगी आहे. माझे दिवस आल्यावर मीही चावा घेतल्याशिवाय सोडणार नाही.

भाऊ पुष्कळ दिवसापासून बहिणीला भेटावयास जात नाही. तेव्हां ती विव्हळते व म्हणते,

" वाट पाहूं पाहूं डोये झाले कुकावानी
येव्हळी तुही मया काहून झाली लेकावानी
निंबाच्या निंबोया निंबाखाली पसरती
भावाले झाल्या लेकी वहीनीले इसरती

अर्थ :— तूं आज येशील उद्यां येशील अशी वाट पाहिली. रडले. डोळे कुंकासारखे लाल केले. येवढा तूं प्रेमळ. पण परक्यासारखा झालास. कारण आतां तूं आपल्या बालगोपाळांत मग्न आहेस. आणि जग म्हणतेंच आहे कीं भावांना मुली झाल्या म्हणजे ते बहिणीला विसरतात.

आई व बाप ह्यांच्या प्रेमाची ही तुलना किती समर्पक आहे पहा !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" माय तुही मया घराच्या दारालोक
बापाजीची मया आली डोंगर चिरत.
मायेचा उपकार फेळीन चोईडोई
पित्याचा उपकार सिरी झालं वझं बाई "

अर्थ :– आईचें प्रेम फक्त घराच्या दरवाजापर्यंत. पण बापाची माया व छाया डोंगर (अडचणींचे) चिरून जातात. आईचा उपकार चोळीलुगडें घेऊन फेडतां येतो पण बापाचा उपकार म्हणजे न फिटणारा उपकार आहे.

शेवटीं खालील ओळींनी ही समीक्षा संपविते
" सरल दयन कसी म्हूंनू मी सरलं
भाऊ इ भाच्यानं माझं माहेर भरलं "

अर्थ :– हें दळण संपलें. पण संपलें कसें म्हणू ? कारण माझें माहेर भाऊ भाच्यांनी भरलेलं आहे. माझें हृदय माहेर–गीतांनी भरलेलें आहे.

साहित्य समालोचन

लीळाचरित्र

भाग १ ला : एकांक

महानुभाव संशोधकांच्या पंचकृष्णांपैकी एक प्रा. ह. ना. नेने यांनी 'लीळाचरित्र: एकांका'ची सुधारून वाढविलेली प्रस्तुत आवृत्ति* वाचकांना दुसऱ्यान्दा सादर केली आहे. श्री. नेने हे उत्कृष्ट शिक्षक, शिक्षण–मानसशास्त्रज्ञ, प्राचीन मराठीचे व्याकरणतज्ज्ञ इत्यादि विविध नात्यांनी मराठी वाचकांना फार पूर्वीपासून परीचित असले, तरी महानुभाव संशोधक म्हणून त्यांची ख्याती विशेष आहे. वऱ्हाड–मध्यप्रांतांत महानुभावीय गद्यग्रंथांच्या शास्त्रीय संपादनाचा पायंडा कै. भवाळकर यांच्या प्रोत्साहनाने व सहकार्याने श्री. हरीभाऊ नेने यांनीच पाडला असें म्हणायला प्रत्यवाय नाही. 'श्रीचक्रधरसिद्धान्तसूत्रें' भा. १ व 'दृष्टान्त पाठ' हे भवाळकरांच्या सहकार्याने तयार केलेले दोन ग्रंथ सोडल्यास 'लीळाचरित्र' (एकांक, पूर्वार्ध भाग ४ व उत्तरार्ध), 'सूत्रपाठ', 'नित्यदिनी लीळा', 'आचारस्थळ', 'महावाक्यप्रमेय', 'लक्षणरत्नाकर' इत्यादि विनीचे महानुभावीय गद्यग्रंथ प्रकाशांत आणून श्री. नेने यांनी प्राचीन मराठीची व मराठीच्या माहेरघराची फार मोठी सेवा केली आहे. श्री. नेने यांच्या विविध प्रकारच्या वाङ्मयसेवेंतून, त्यांनी केलेली महानुभाव वाङ्मयाची सेवा, वाचकांच्या सदैव लक्षांत राहील.

'लीळाचरित्र' हा मराठी गद्यवाङ्मयाचा आरंभबिंदू आहे. मराठी गद्यवाहिनीची गंगा चक्रधरांच्या मुखांतून नागदेवाचार्यांच्या स्मरण–मननांतून व म्हाइंभट्टांच्या लेखणींतून बाहेर पडली आहे. महाराष्ट्र-शारदेच्या वैतालिकाचा पहिला मान मुकुंदराजांकडे जातो. 'वैनगंगे'च्या तीरावरील 'मनोहर अंबानगरी'च्या पहाडांतून मराठीची काव्यगंगा पाझरली. विदर्भातल्या महानुभावीय कवींनी आणि ग्रंथकारांनी नागदेवाचार्यांच्या आदेशानुसार मराठींतच आपली ग्रंथरचना केली आणि मराठीच्या गंगेला उगमाचें नव्हे तर संगमाचें पावित्र्य प्राप्त करून दिलें. हा प्रवाह पुढें गोदावरीला जाऊन मिळाला. गोदावरींतून इंद्रायणीला. तुकारामांनी या गंगेचें तीर्थ साऱ्या महाराष्ट्रावर शिंपडलें...

महानुभावीय काव्याच्या वाङ्मयीन स्वरूपाकडे पाहिलें म्हणजे संस्कृतांतल्या 'वैदर्भी रीती'ची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. ललित आणि मृदुमधुर पदरचना, रम्य आणि स्वाभाविक शब्दचित्रें, आणि सहज ओघानें होणारी रसप्रतीति हे 'वैदर्भी रीती'चे विशेष महानुभावीय कवींच्या 'साती' ग्रंथांत उत्कटत्वानें प्रतीत होतात. भास्करभट्ट, नरेंद्रपंडित, दामोदरपंडित, विश्वनाथपंडित, नारायणपंडित इत्यादि

---

* 'लीळाचरित्र' भाग १ ला : एकांक : संपादक– ह. ना. नेने. मुद्रक: पां. ना. बनहट्टी, वनतोली, नागपूर. (संशोधित आवृत्ति तिसरी) शके १८७५; किंमत दोन रुपये.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महानुभावीय कवींच्या संस्कृत काव्यांच्या दृढ व्यासंगाचाहि तो परिणाम असेल कदाचित्. मराठींत 'वैदर्भी रीती'चें प्रवर्तन करणारें काव्य निर्माण करण्याचें श्रेय या 'वैदर्भी' कवींनाच आहे हें निर्विवाद.

काव्याप्रमाणेंच महानुभावांचें गद्यहि अत्यंत स्वाभाविक आणि ललितमधुर आहे. तुटक तुटक रेघोट्यांतून जिवंत चित्रें निर्माण करणाऱ्या कलावंताच्या कौशल्यानें महानुभावांनी आपलं गद्यवाङ्मय निर्माण केलें. 'एथ जाति कुळ नाही: खुंट दावे नाही' (एकांक १६) या वाक्यांतून व्यक्त होणारी चक्रधरांची निर्मम वृत्ति, 'माझें माहेर गेलें' म्हणून गोविंदप्रभूंच्या निधनसमयी 'हालळ वील्हळ' आणि 'आळाप आळापी' रडो लागणारी त्यांची लेक (गो. प्र. च. ३२५) 'पतीचेया सुखावांचौनि सकळही सुखें दैन्यें आन पाप' असें सडेतोड उत्तर भावाला देणारी 'दुर्भगाप्रमेयां'ली पतिव्रता, किंवा 'सुवर्णाचिया पाइरीया जालीया तरि काइ डोइये चालो एल' (वृद्धाचार) असें म्हणणारा आनोबास–हीं सारीं शब्दचित्रें जिवंत नाहीत असं कोण म्हणेल?– हें गद्य असलं तरी शैली आणि आशय या दोन्हीहि दृष्टींनी तें 'काव्य'च आहे. महानुभावांच्या गद्यांत साधेपणाचें सौंदर्य आहे, भावनेचा रसरशीतपणा आहे आणि वाचकांच्या हृदयाचा ठाव घेणारें सौहार्दहि पण आहे. 'गद्यं कवीनां निकषं वदन्ति–' या दृष्टीनें पाहिलें तर अशा गद्याला काव्य आणि तेंहि 'वैदर्भी रीती'चें काव्य म्हणायला कसलीहि हरकत राहू नये.

श्री. नेने यांनी मराठींतल्या आद्य गद्यग्रंथांचें व महानुभावांच्या धर्मग्रंथांचें अद्ययावत् संशोधन करून प्राचीन मराठीच्या व महानुभाव वाङ्मयाच्या संशोधकांत वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविलें आहे. प्रस्तुत 'लीळाचरित्र–एकांका'ला त्यांनी चाळीस पानांचा 'उपोद्घात' व वीस पानांच्या 'टीपा' जोडून आणि त्याच्याच जोडीला यादवकालीन मराठी गद्याची 'व्याकरणविषयक' चर्चा करून त्याला अद्ययावत्पणा आणला आहे. पदवीपरीक्षेचा अभ्यास करणाऱ्या मराठीच्या विद्यार्थ्यांना तर ही आवृत्ति मार्गदर्शक होईलच, पण सर्वसामान्य वाचकालासुद्धा ती उद्बोधक होईल व यादवकालीन मराठी गद्याविषयी त्याच्या मनांत प्रेम निर्माण करील यांत शंका नाही. चक्रधरकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, भौगोलिक व अध्यात्मिक स्थितीवरहि त्यामुळे प्रकाश पडूं शकेल.

एक दोन प्रश्न मात्र इथें उपस्थित करतों.

गुजराथचा प्रधानपुत्र हरिपाळदेव याच्या मृत शरीरांत 'फलेठाणीं कऱ्हाडेया ब्राम्हणाचां घरीं' 'अवतारू' स्वीकारणाऱ्या (एकांक १) चांगदेव राउळांच्या आत्म्यानें प्रवेश केला, प्रधानपुत्र जिवंत झाला व हा पुनर्जीवित हरिपाळदेव म्हणजेच 'सर्वज्ञ' श्रीचक्रधरस्वामी होत असें 'एकांकां'त सांगितलें आहे. महानुभावहि तसेंच मानतात. तसें मानलें नाही तर त्यांच्या दृष्टीनें चक्रधरांचा अवतार सिद्धच होऊ शकत नाही.

पण, 'पुरस्वीकारा'ची ही लीळा कितपत विश्वसनीय मानावी अशी शंका मनांत उभी राहते. हरिपाळदेव हा प्रधानपुत्र होता. त्याच्या प्रेतयात्रेला, प्रधानपुत्राची प्रेतयात्रा म्हणून अनेक लोक हजर असतील. त्याची राणी सती जाणार असल्यामुळे तर विशेषच गर्दी असेल. (आजच्यासारखीं त्यावेळीं स्मशानांत मृताचा गुणगौरव करणारीं भाषणें होत असत की, नाही हें कळायला मार्ग नाहीं.)

'लीळाचरित्रा'च्या एका पोथींत हा वृत्तान्त पुढीलप्रमाणें दिला आहे–

"…प्रधानपुत्राचे देह गेले: तया कारणें माड केले: नगरांतुनि वाहिरी आनिलें: नगर विसावा दीधला: मग वाद्यंत्र नादेसि निगाले: ऐसे गावापूर्वे नैचिये थडिये रुद्रभूमिका तेथ सत्यांचा वड होता: तेथ ते प्रधान कुमराचे देह श्मशानासि आनिलें होतें: एरीकडे कमळाराणी सती रीगावेया गांवामाजी मीरवावेया आइती करीत होती: तंव ते पतित एवें उठऊनि स्वीकरिलें…तंव लोकीं ऐसे देखौनि भणितले: आरे, वास पाहताए कुमरु नाही निवर्तला आन भणितलें: कुमर जियाला: वाद्यंत्रें लागलीं: मढतुरें वाजतें होती तियें सुहावी वाजों लागली…"

पण या महत्वाच्या घटनेला गुजराथच्या इतिहासांत किंवा लोककथांत आधार सांपडूं नये हें आश्चर्यच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही काय? 'मातापुरा न वचावें' हें वचन महानुभावांना प्रमाण असूनहि 'माहूर' हें महानुभावांचं फार मोठं क्षेत्र आहे. मग ज्या ठिकाणीं चक्रधरांनी 'अवतारस्वीकार' केला, तें गुजराथमधलं स्मशान हें तर महानुभावांचं सर्वांत मोठं क्षेत्र व्हायला पाहिजे. 'एथिचिया संबंधा गेले तेतुले वोटे गोटे आदिकरौनि तुम्हा नमस्करणीये की गा' (आचार १८६) किंवा 'हे होते तेय जाईजे'– (ली. च. उत्त. ५२) असं म्हणणाऱ्या चक्रधरांच्या 'पुरस्वीकारा'च्या स्थळी महानुभावांचें मोठें क्षेत्र असू नये हें आश्चर्यच नाही काय?–

दुसरा प्रश्न असा, की 'रामयात्रे'च्या निमित्तानें (एकांक ७) पुनर्जीवित, हरिपाळदेव जे गुजराथेंतून 'महाराष्ट्रां'त आले, ते पुन्हा परत गुजराथला कधींच गेले नाहीत. गुजराथचे राजे आणि महाराष्ट्राचे राजे यांच्यांत शत्रुत्व असूनहि[1] व 'तो देसू पारका : तेथ जाओं नै ए' असं प्रधानानं सांगितल्यावरहि ते 'महाराष्ट्रां'त आले हें विशेष होय.

'महाराष्ट्रां'त आल्यावरोवर हरिपाळदेवानें गुजराथची–ज्या हरिपाळदेवानें गुजराथवर चाल करणाऱ्या सिंघणाच्या सैन्याला पळवून लावलें होतें[2] व दुसऱ्यान्दा गुजराथवरल्या परचक्राचें निवारण करीत असतां ज्याच्या भिवईवर व्रण झाला होता[3] त्या हरिपाळदेवानें आपल्या मातृभूमीची–आठवणहि काढूं नये याचें आश्चर्य वाटतें. जणुं त्याचा आणि गुजराथचा कांही संबंधच नव्हता. प्रधानाचें मुलावर इतकें प्रेम असूनहि (एकांक ६) त्याचें पुढें काय झालें याची त्यानें चौकशीहि केली नाही.

ऋद्धिपूरला गोविंदप्रभूंपासून शक्तिस्वीकार केल्यानंतर हरिपाळदेव 'चक्रधर' झाले. 'चक्रधरां'नी महानुभाव पंथाची संस्थापना केली, महाराष्ट्र-भाषेचा स्वीकार केला, महाराष्ट्राला आपली कर्मभूमि मानली व 'महाराष्ट्रीं असावें' (आचार) असा आपल्या अनुयायांना दंडकहि घालून दिला. अर्थात्, महानुभाव पंथाचे संस्थापक 'श्रीचक्रधर' हे 'महाराष्ट्रीय' आहेत यांत शंका नाही.

पुनर्जीवित हरिपाळदेव हा देखील 'महाराष्ट्रीय' ठरूं शकेल. कारण, हरिपाळदेवाच्या मृत शरीरांत प्रवेश करणार आत्मा महाराष्ट्रांतल्या चांगदेवराउळांचा होता. 'कामाख्येच्या निमित्तानं चांगदेव राउळांनी 'पुरत्याग' करताच 'तिए समइं गुजरातेचेया प्रवानाचेया कूमराचें देह गेलें : तें समसाना आणिलें होतें : तेव्हळि तें स्वीकरीलें' (एकांक ४, पृ. ३) पुनर्जीवित हरिपाळदेवाचा गुजराथशी कांहीहि संबंध नव्हता याचें थोडें दिग्दर्शन वर केलेंच आहे.

'कांतिएच्या लीळें'त (एकांक १०) चक्रधरांनी उवळीनायांपासून 'वयस्तंभिनी विद्या' स्वीकारली होती असें सांगितलें आहे. वयस्तंभिनी विद्या म्हणजे वय कायम ठेवणारी विद्या. ही विद्या स्वीकारतेवेळी चक्रधरांचें जें वय होतें (सुमारें सव्वीस सत्तावीस वर्षें) तेंच शेवटपर्यंत कायम होतें असा या लीळेचा अर्थ होतो. 'तिसि सहस्त्र वरूषां आयुष्य' ही 'विचार. वंदांत'ली परशरामबासाची वासना या लीळेवरूनच अस्तित्वांत आली असावी. यावरून स्वामी अद्यापि जिवंत आहेत व वयाच्या तारुण्यावस्थेंत जिवंत आहेत असें मानावें लागेल.

मग, 'वृद्धापि (वार्धक्य) आलें मा' (ली. च. उत्त. ३८० पृ २२५) असं चक्रधरांनी कां म्हणावें?– चक्रधरांच्या आयुर्मर्यादेचा अजून व्हावा तसा विचार झाला नाही. चिकित्सक बुद्धीनं तो व्हावला हवा एवढेंच मला इथें सुचवायचें आहे.

असो. 'लीळाचरित्र' हा मराठींतला आद्य गद्यग्रंथ असल्यामुळें त्याचें महत्व विशेष आहे. त्यांत चरित्र आहे, आत्मचरित्र आहे, आठवणी आहेत, आख्यायिका आहेत, स्थलवर्णनं आहेत, व्यक्तिवर्णनं आहेत आणि चमत्कारहि पण आहेत. मराठीच्या आरंभकालीन गद्याचाच केवळ नव्हे तर यादवकालीन महाराष्ट्राच्या

---

१. सेजा सिंघण देवो राज्यो करीतुसे: गुजरा आन जाधव उभा दंदु लागैला असे:

२....तवं सिंघण रायाचें कटकु गुर्जरावरि चालिलें...सिंघणें चालीकेली...ऐसी प्रधान पुत्राची कटकैची आइती आइकौनि जाधवाचे कटक मुरडले: तवं प्रधान पुत्र सर्व दळें तया कटका टाकौनि गेला: मा जगळदयासि: वीञ्ज्ञदयासि युद्ध केलें: तें प्रधानपुत्रें भंगिले: तो ठानी बैसवीत यळापुर वेन्ही आला:

३. तवं परचक्र चालिलें: तै कांदी पडिली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सामाजिक, राजकीय, भौगोलिक आणि आध्यात्मिक परिस्थितीचा चित्रपट वाचकांच्या डोळ्यांपुढे उभा करण्याचें सामर्थ्य 'लीळाचरित्रां'त आहे. अशा अनन्य महत्वाच्या ग्रंथाचं अद्ययावत् संपादन केल्याबद्दल श्री. नेने यांना धन्यवाद...

— सुरेश डोळके

मराठी कादंबरी*

भाग १ व २

मुंबई मराठी साहित्यसंघाच्या विद्यमानें कै. वामन मल्हार जोशी यांच्या स्मृतिदिनानिमित्त होणाऱ्या व्याख्यानमालेंत सुप्रसिद्ध लेखिका प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांनी 'मराठी कादंबरीचें पहिलें शतक' या विषयावर इ. स. १९४८ सालीं जीं व्याख्यानें दिलीं तीं आतां पुस्तकरूपानें दोन भागांत प्रसिद्ध झालीं आहेत. पहिला भाग जुलै १९५३ मध्यें प्रसिद्ध झाला होता. यानंतर मार्च १९५४ मध्यें दुसरा भाग प्रसिद्ध झाला आहे.

मराठी कादंबरीवाङ्मय फार तोकडें अगर थोडकें आहे असें एरवीं वाटलें तरी त्या वाङ्मयाचा अभ्यास करायला बसल्यावर तें विपुल असल्याचा साक्षात्कार अभ्यासकाला होतो. तें समग्र — निदान यांतला बराचसा भाग वाचून त्याचं समीक्षण करायचं आणि त्याचा सुसंगत इतिहास लिहायचा ही गोष्ट सोपी नाही. अत्यंत परिश्रमपूर्वक सामुग्री गोळा करून प्रस्तुत व्याख्यानें दिल्याबद्दल व पुन्हा तीं ग्रंथनिविष्ट केल्याबद्दल प्रा. कुसुमावती यांचें अभिनंदन करायला पाहिजे.

गेल्या शंभर वर्षांतील मराठी कादंबरी वाङ्मयाचा पसारा येथे समीक्षणाच्या कक्षेत आणला गेला आहे. त्यांतील सर्व प्रमुख कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचा परामर्श घेण्यांत आला असून इतरहि अनेक कादंबऱ्यांचा ओझरता परिचय करून देण्यांत आला आहे.

प्रा. न. र. फाटक यांनी 'पुरस्कारां'त म्हटल्याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथांत लेखिकेची भूमिका केवळ इतिहासकथनाची नाही, तर ती समीक्षकाची आहे. असें असल्यामुळे या ग्रंथाचें महत्व विशेष मानलें पाहिजे. कारण केवळ इतिहासकथनापेक्षा कोणत्याहि वाङ्मयांत दिसून येणाऱ्या प्रवृत्तींचें दिग्दर्शन व विवेचन, ह्यांची उत्क्रांति व विकास यांचें दर्शन, आणि ह्यांच्या कारणांची मीमांसा या गोष्टी विशिष्ट वाङ्मयाचें सम्यक्दर्शन व मूल्यमापन या दृष्टीने अधिक महत्वाच्या ठरतात. प्रस्तुत ग्रंथाच्या या विशिष्ट स्वरूपामुळे ह्याला जसें महत्व प्राप्त झालें आहे तसेंच लेखिकेचा मार्ग कठीण झाला आहे ही गोष्ट खरी. इतिहासाच्या कालगतीला तर सोडायचें नाही, पण ठिकठिकाणीं थांबून, क्वचित आडमार्गाला जाऊन निरीक्षण, समीक्षण, परीक्षण आणि मूल्यमापनहि करावयाचें असा हा कष्टसाध्य प्रवास आहे. यांत लेखिकेला कितपत यश लाभलें ?

'लक्षणीय कृतींचें विवेचन करतांना मी केवळ त्यांचें अंतरंग उकलून दाखविण्याचीच दृष्टि ठेवली, एखाद्या निश्चित कादंबरीविषयक पूर्वसिद्ध कल्पनेंत सर्व प्रकार बसवण्याचा प्रयत्न केला नाही' असा खुलासा प्रस्तावनेंत केला आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार असा चमत्कारिक आहे की ह्याला एका निश्चित शब्दार्थाच्या व्याख्येमध्यें बसविणें कठीण आहे. आणि सामान्यतः ज्या ज्या ग्रंथांना कादंबरी हें नांव देण्यांत येतं त्या त्या सर्वांना आपल्या अर्थाच्या कक्षेंत सामावू शकणारी व्याख्या करणं हें त्याहूनहि कठीण आहे. पण असं असलं तरी प्रस्तुतसारख्या कादंबरीवरील समीक्षणात्मक इतिहास ग्रंथामध्यें कादंबरीच्या स्वरूपाविषयीं चर्चा करून कांही निश्चित कल्पना ह्या वाङ्मयप्रकारासंबंधी पुढे ठेवणें आवश्यक होतं आणि शक्यहि होतं. कादंबरी हा कथात्मक वाङ्मयाचा प्रकार असल्यामुळे आणि कथात्मकवाङ्मय विपुल व विविध असल्यामुळे जें जें कथात्मक गद्य असेल तें तें कादंबरी वाङ्मयामध्यें समाविष्ट करण्यांत येऊं लागलं. आणि ह्यामुळेच कादंबरीचें स्वरूप निश्चित करणें कठिण वाटूं लागलें. वास्तविक आता कादंबरी हा प्रकार इतका विकसित झाला आहे की तो सर्वसामान्य गद्यकथा वाङ्मयापासून वेगळा काढतां येईल. इंग्रजीमध्यें Prose Fiction व Novel हे दोन शब्द प्रचारांत आहेत व ते कित्येकवेळां पर्याय म्हणून वापरले जातात. परंतु Fiction हा अधिक व्यापक शब्द आहे आणि Novel हा त्या मानाने मर्यादित अर्थाचा शब्द आहे याची जाणीव इंग्लिश टीकाकारांनाहि झालेली आहे. (Richard Burton याने आपल्या 'Masters of the English Novel' या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणांत असा फरक मुद्दाम केला आहे.)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'कादंबरीविषयक पूर्वसिद्ध कल्पनेंत सर्व प्रकार बसवण्याचा प्रयत्न आपण केला नाही' असें प्रस्तावनेंत म्हटलें असलें तरी समीक्षेच्या वेळीं, 'अभिजात कलेचा मान-दंड' ठरविला आहेच. हा मानदंड कोणता हें साऱ्या विवेचनांतून शोधून काढणें कठिण व्हावें इतकें तें विस्कळित व दुर्बोध आहे. मात्र या मानदंडा शेजारीं प्रत्येक कृतीला उभी करून तिचें मोजमाप घेतलेलें नसल्यामुळे तसें करणें शक्य नाही असें स्वतः कुसुमावतीबाईंनाच पुढे वाटलें असावें—ह्यासंबंधी इथे अधिक लिहिणें अनावश्यक आहे. जातां जातां एक दोन गोष्टी मात्र सांगितल्या पाहिजेत.

पहिली ही की, कलाकृतीचं मूल्यमापन करतांना तिच्या सौन्दर्याचा विचार प्रामुख्याने करायला पाहिजे. कादंबरी, मग ती कशीहि असो, आधी 'रोचक' असली पाहिजे. ही रोचकता कथानकांत असेल, पात्रांत असेल, अगर इतर कशांत असेल. पण नित्शे (E. Nitchie) ने म्हटल्या प्रमाणें ' Interest of of some sort there must be ' (The criticism of literature –228). आणि तिनेंच पुढे म्हटल्याप्रमाणें ही रोचकता (Interest) कशांत आहे हें वाचकाला सांगतां आलं की तो टीकाकार झाला. कलाकृति ही आधी कलाकृति आहे की नाही हें ठरवून– म्हणजे तिच्यांत कलाकृतीचे किमान गुण आहेत की नाही हें ठरवूर–मग गुण दोष विवेचनाला प्रवृत्त व्हावें हें योग्य. उदाहरणार्थ, डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या ' कादंबऱ्या ' आहेत की नाहीत हें आधी ठरवून मग त्यांचा ' टीकेंत ' समावेश करायला पाहिजे. प्रस्तुत ग्रंथांत डॉ. केतकरांच्या संबंधीचीं आलेलीं विधानें लक्षांत घेतलीं म्हणजे त्यांच्या कादंबऱ्यांना वाजवीपेक्षां जास्त महत्त्व विवेचनांत दिलें गेलें आहे असें दिसतें. हीं दोनच विधानें पहा.

' त्यांची (केतकरांची) पद्धति विश्लेषणात्मक व कथनात्मक असते. त्यांची दृष्टि निर्भ्रम असते-तशीच त्यांची वृत्ति भावनाविरहित असते. घटितें जुळवून अर्थसंगतीचें किंवा तत्त्वसंगतीचें दिग्दर्शन करणाऱ्या शास्त्रज्ञाच्या वृत्तीने ते मानवी आशाआकांक्षांचें चित्रण करतात '– भाग पहिला- पृ. १८०. आता दुसरा एक उतारा पहा–

" त्यांचीं कथानकें सुसंबद्ध नसतात, त्यांची निवेदनपद्धति अचतुर असते, औचित्यभंगाचा दोष त्यांच्या कथांमध्यें अनेकदा उद्‌भवतो व त्यांची भाषा ओवडधोवड असते इ. आक्षेप त्यांच्या कादंबऱ्यावर घेतले जातात व या आक्षेपांचें निराकरण स्वतः केतकरांना देखील समाधानकारकपणें करतां आलें नाही ". पृ.– १८२. हे दोन्ही उतारे वाचले म्हणजे केतकरांच्या कादंबऱ्यांचें लांबच लांब समर्थनवजा विवेचन जें या ग्रंथांत आलें आहे तें अनाठायीं आहे असें वाटतें. मात्र केतकरांचें समर्थन पूर्णपणें करतां येण्यासारखें नाही याची जाणीव प्रा. कुसुमावतीबाईंनाच असावी. म्हणून शेवटीं त्या कबुली देतात की, 'कादंबरी लेखनाचे' अंतिम निकष लावूं लागल्यास... केतकरांची निर्मिति अपुरी पडेल हें कोणालाहि मान्य करावें लागेल.' –पृ. १८३. केतकरांविषयींचें या ग्रंथांतलें विवेचन म्हणजे अन्यत्रहि आढळणाऱ्या मोघम, बरसोडीच्या विवेचनाचा उत्तम मासला म्हणतां येईल. ' कथा ' (Fiction) व कादंबरी (Novel) यांत आता भेद करायलाच पाहिजे. म्हणजे पुष्कळशा 'कादंबऱ्या' (?) ' गद्य कथा ' या सदरांत जाऊन पडतील.

यांतूनच निघणारी दुसरी गोष्ट अशी की, 'तंत्रा'ला अगदीच दुर्लक्षित करणें, त्याला फारच कमी महत्त्व देणें योग्य होणार नाही. 'तंत्र' म्हणजे पात्र; पेय नव्हें; अगर तंत्र म्हणजे केवळ भाजन, भोजन नव्हें असें भासविलें जातें. पण वास्तविक तंत्राचा व कलाकृतीचा संबंध इतका उपरा नव्हें. तंत्र म्हणजे बाहेरून लादलेले नियम नव्हेत. लेखकाला जो कांही अनुभव सांगायचा असतो तो ज्या रीतीने बाहेर पडतो त्या रीतिसंबंधीचे नियम म्हणजेच तंत्र. लेखकाच्या अनुभवांचा बाह्य आविष्कार आणि म्हणूनच त्या आविष्काराचे नियमहि महत्त्वाचे आहेत.'For Fiction is one mode of conveying to the reader a special kind of experience that the writer has had and has considered valuable; and the critic is right to stamp as poor writing any story in which the verbal expression does not measure up to the value of the content.'–E. Nitchie–'The criticism of Literature' P. 254.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रस्तुत ग्रंथांत तंत्राकडे गौणतेच्या भावनेनेच पाहिल्याचा भास होतो. कादंबरीच्या तंत्रांत गेल्या शतकांत विकास कसा झाला हें या ग्रंथांत दाखविलें नाही त्याला कारणहि हेंच असावें.

कादंबरीचा उगम हें या ग्रंथांतील दुसरें, मोठें व महत्त्वाचें प्रकरण आहे. यांत मराठी कादंबरीच्या उगमासंबंधी विचार मांडलेले असून पहिल्या 'अद्‌भुत' युगांतील कादंबऱ्यांची ओळख करून दिलेली आहे ती रास्त आहे. या प्रकरणांतील प्रारंभीचें विवेचन मात्र सर्वांशाने मान्य होण्यासारखें नाही. इंग्रज येथे आले नसते तर कादंबरी मराठींत आली असती की नाही याची चर्चा अप्रस्तुत आहे. इतिहास एवढेंच सांगतो की इतर कांही आधुनिक वाङ्मयप्रकारांप्रमाणें कादंबरी हा प्रकारहि आपल्याकडे इंग्रजी अमदानींत, त्यांच्या वाङ्मयाच्या परिशीलनाने व अनुकरणाने सुरू झाला. आणि हें मान्य करण्यांत अवघड वाटण्यासारखें कांहीच नाही. पण असें अवघड वाटल्यामुळेच की काय प्रा. कुसुमावतींनी आपल्याकडे कादंबरीची सामुग्री पूर्ण तयार होती असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. इतकेंच नव्हें तर, 'मोरोपंतांचीं महाभारताचीं पर्वें, रामायणाचे प्रकार, श्रीधराचा रामविजय, वामन-पंडिताचीं आख्यानें म्हणजे एक प्रकारच्या कादंबऱ्याच' असेंहि म्हटलें आहे. एवढ्यावरच सुद्धा न थांबतां पुढे त्या असेंहि म्हणतात, की आधुनिक कादंबरी व वरील दोन्ही प्रकार (म्हणजे कीर्तन व पोवाडे) यांत तंत्र-दृष्ट्या एकच मूलगामी फरक. तो म्हणजे कीर्तन व पोवाडे—लावण्या यांचें माध्यम पद्य तर कादंबरीचें माध्यम गद्य'. कादंबरी आपल्याकडे होतीच हें दाखविण्याच्या हट्टामुळे हें चुकीचें विधान केलें गेलें हें उघड आहे.

तिसऱ्या प्रकरणांत ऐतिहासिक कादंबरीसंबंधी जें विवेचन केलें आहे तें चिंत्य आहे. ऐतिहासिक कादंबरींतील "पात्रें, प्रसंग व स्थळ, काल्पनिक घेऊन जुन्या चालीरीति व वातावरण यांच्या साहाय्यानें ऐतिहासिक सत्याभास निर्माण करावा" हें प्रियोळकरांचें विधान उद्धृत करून त्याला आपली मान्यता प्रा. कुसुमावतीबाईंनी दर्शविली आहे. पण पुढील साऱ्या विवेचनाचा सूर मात्र ऐतिहासिक कादंबरींत इतिहास असतो, ऐतिहासिक व काल्पनिक दोन्ही भाग तींत असतात असाच आहे. आणि ऐतिहासिक कादंबरी-विषयीं हा दुसरा दृष्टिकोनच रास्त आहे. खरें म्हटलें म्हणजे ऐतिहासिक कादंबरी व ऐतिहासिक पार्श्व-भूमिवर आधारलेली कादंबरी असे दोन प्रकार मानावेत. याचा विस्तार करण्याचें हें स्थळ नव्हे.

पुढच्या 'हरि नारायण आपटे' या प्रकरणांत हरिभाऊंच्या सर्व कादंबऱ्यांचा परिचय करून देण्यांत आला आहे. त्याचा अभ्यासकाला चांगला उपयोग होण्यासारखा आहे. मात्र हरिभाऊंच्या कादंबरीलेखन-कलेचा विकास या विवेचनाने लक्षांत येत नाही. प्रक-रणाच्या शेवटी हरिभाऊंनी केलेली वाङ्मयाची व्याख्या उद्धृत केली आहे. तिच्यांतील हरिभाऊंचीं विधानें, प्रस्तुत ग्रंथांत ज्या सामाजिकतेचा, मानवतेचा वगैरे कलेंत वडेजाव वर्णिला आहे त्याच्या विरुद्ध जातात. हरिभाऊंचें विधान असें, "सौंदर्याच्या आश्रयाने आनंद उत्पन्न करून सत्याचा संचार मनुष्याच्या मनांत करवून दिला जातो, तो या विदग्ध वाङ्मयाने होय. (पृ. १२३). सौंदर्य व आनंद या कसोट्या या ग्रंथांत कुठेच वापरल्या नाहीत. हरिभाऊंचीं हीं मतें प्रा. फडक्यांच्या मताहून फारशीं भिन्न नाहीत हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

पहिल्या भागांतील पुढच्या ऐंशी पानांत वामन मल्हार, डॉ. केतकर व वरेरकर यांच्या कादंबऱ्यांचें फार विस्ताराने वर्णन केलें आहे व त्या खालोखाल ना. ह. आपटे, हडप, नाथमाधव यांच्या कादंबऱ्यांचें विवेचन आलें आहे.

दुसऱ्या भागांत ना. सी. फडके, पु. य. देशपांडे, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर या कादंबरी-कारांच्या कादंबऱ्यांचें एकेका स्वतंत्र प्रकरणांत बऱ्याच विस्ताराने विवेचन केलें आहे. यांत अर्ध्याहून अधिक भाग खर्ची पडला आहे. राहिलेल्या भागांत 'वोकील ते क्षीरसागर', 'लेखिका', 'वेगळ्या वाटा', 'भाषां-तरित कादंबऱ्या' इ. प्रकरणें आहेत. त्यांच्या नांवा-वरून त्यांतील विषयांची कल्पना येऊं शकेल.

निरनिराळ्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचें मूल्यमापन करतांना मागच्या भागांतील धरसोडीचा प्रकार याहि भागांत दिसतो. निर्णयांत मोघमपणा असल्यामुळे कित्येकदा लेखिकेला नक्की काय म्हणायचें आहे हेंच कळत नाही. कधी कधी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विसंगतिहि उत्पन्न झाली आहे. याचें एक गमतीदार उदाहरण पहा. फडक्यांच्या 'जादूगार' या कादंबरी-विषयीं पृ. १२ वर पहिल्या परिच्छेदांत असें विधान केलें आहे कीं, 'फडके यांच्या कादंवरी लेखनाचा आणखी एक ठळक विशेष त्यांच्या या पहिल्याच नामांकित कादंवरींत दिसून येतो. तो म्हणजे कथानकांतील संघर्षशून्यता'. आणि याच पानावर याच कादंवरी संबंधी दुसऱ्या परिच्छेदांत असें म्हटलें आहे कीं, 'आनंदरावांची आपल्या कलेविषयीं ओढ व त्यांचें इंदुमतीवरील अभावित प्रेम यांचा संघर्ष व संयोग बऱ्याच समजदारपणें व कुशलपणें रंगवला गेला आहे'. दुसरें एक उदाहरण पहा. 'फडके यांची कला वास्तविक साधारण वाचकांच्या दृष्टीने देखील पुनःप्रत्ययकारी नाही. त्यांनी आपल्या कथांमध्यें सामान्यांच्या जीवनांतील वरीच सामग्री वापरली आहे. त्यांचे कांही मनोधर्म, कांही निष्ठा, कांही जीवन विषयक उपकरणें, व्यवहाराच्या व वागणूकीच्या लकबी इत्यादींचा कुशल उपयोग त्यांनी केला आहे' (पृ.३३व३४)ही वाक्यें खरोखरीच सलग आहेत.पण किती विसंगत ! इतकी सामग्री जर सामान्यांच्या जीवनांतली वापरली गेली असेल तर त्यांत सामान्यांना पुनःप्रत्यय कां येणार नाही ?

फडक्यांच्या विषयींचें एकंदर विवेचन पाहून असें वाटतें की 'त्यांच्या कादंबऱ्यांतील सौंदर्य तरी अमान्य करवत नाही पण त्यांना श्रेष्ठ कादंबरीकार म्हणवतहि नाही' अशी कांही चमत्कारिक स्थिति प्रा. कुसुमावतीबाईंची झाली असावी. एकंदरींतच या कालखंडांतील कादंवरीकारांच्या विषयींच्या बऱ्यावाईट पूर्वग्रहांतून वर निघून शुद्ध दृष्टीनें विवेचन करणें त्यांना शक्य झालें नसावें असें वाटतें. कादंवरीविषयक निश्चित कल्पना दृष्टिपुढे न ठेवल्यामुळेहि मूल्यमापन धरसोडीचें झालें असावें.

एकंदर ग्रंथांतील विवेचनाचें स्वरूप व त्याची दिशा लक्षांत यावी या दृष्टीनेच कांही स्थळांचा विचार येथे केला आहे. मान्य होईल असा जो विवेचनाचा भाग या ग्रंथांत आहे–आणि तो पुष्कळच आहे–त्याचा विचार येथे करणें अनावश्यक आहे. तो वाचकांनी मुळांतूनच पहावा. प्रमुख कादंवरीकारांच्या सर्व प्रमुख कादंबऱ्यांची अत्यंत मार्मिकतेने व सुंदरतेने ओळख या ग्रंथांत करून देण्यांत आली आहे. हें कादंवरीच्या अभ्यासकाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त झालें आहे. मात्र गेल्या शतकांतील या वाङ्मयाचे कांही कालखंड पाडून, त्यांत निर्माण झालेल्या वाङ्मयाचें वैशिष्ट्य, त्यावर झालेला काळाचा परिणाम इ. विवेचन जर आलें असतें व सर्व दृष्टीने कादंवरीचा विकास या शतकांत कोणत्या रीतीने झाला याचें दिग्दर्शन त्यांत स्पष्टपणें केलें असतें तर ग्रंथाचें मोल आहे त्यापेक्षाहि अधिक वाढलें असतें. आहे त्या स्थितींतहि या ग्रंथाने मराठी टीकावाङ्मयांत मोलाची भर पडली आहे याबद्दल शंका नाही.

– श्री. मा. कुलकर्णी

* मराठी कादंवरी, भाग १ व २. प्रकाशक : मुंबई मराठी साहित्यसंघ, मुंबई

श्रीविष्णुदास चरितामृत

खंड २ व ३

(लेखक– श्री. नरहर सदाशिव जोशी उर्फ खरशीकर शास्त्री.)

प्रस्तुत चरित्रग्रंथाच्या पहिल्या खंडाचें परीक्षण 'युगवाणीं'त मागे (नोव्हें. १९५२) येऊन गेलें आहे. त्यानंतर क्रमशः वरील दोन खंड प्रसिद्ध होऊनहि बरेच दिवस लोटले आहेत.

पहिल्या खंडांत श्रीविष्णुदासाचें पत्निनिधनापर्यंतचें चरित्र येऊन गेलें होतें. त्यानंतरचें शांतरस-प्रधान चरित्र या पुढील दोन भागांत आलें आहे. श्रीविष्णुदासांना श्रीदत्तात्रेय व श्रीरेणुका यांची झालेलीं दर्शनें, महाराजांची झालेली तदाकार वृत्ति, त्या वृत्तींत त्यांना स्फुरलेलें काव्य इत्यादींचें अति सुरम्य वर्णन लेखकांनी मोठ्या तल्लीनतेने केलें असून महाराजांच्या संन्यास ग्रहणाच्या हकिकतीनें दुसऱ्या भागाची समाप्ति केली आहे. आणि तिसऱ्या भागांत महाराजांच्या पार्थिव देहाची समाप्ति होईपर्यंतचा भाग आला असून त्यांत मुख्यत : महाराजांची सिद्धावस्था दृष्टीस पडते. अशा रीतीने या तिन्ही भागांत मुमुक्षु, साधक व सिद्ध या तिन्ही अवस्थांचे महाराजांचें चरित्रचित्रण त्यांचे शिष्य पं. खरशीकर शास्त्री यांनी केलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पहिल्या भागाच्या परीक्षणांत त्या ग्रंथाचीं वैशिष्ट्यें म्हणून जीं दिलीं होतीं तींच या दोन भागांचींहि वैशिष्ट्यें आहेत असें म्हटलें म्हणजे अधिक लिहिण्याची गरज नाही. सध्याचा काळ संतत्वास प्रतिकूल, बुद्धिवादाचा अतिरेक झाल्यामुळे चमत्कारादि गोष्टी व गुरूंचा अनुग्रह वगैरे यावर विश्वास ठेवणाऱ्या मंडळीचा संकोच; भागवत-धर्म येरव्ही कितीहि सोज्ज्वळ असला तरी त्यांतील धर्म शद्वालाच सकृद्दर्शनी बुजणाऱ्या मंडळींचा सुळसुळाट. अशा स्थितींत हें संतचरित्र लिहिण्याचा उद्योग पं. खरशीकरशास्त्र्यांनी केला हेंच मोठें धाडस. तथापि, सश्रद्ध वाचकांस रमविण्याची त्या चरित्र-ग्रंथाच्या ठायीं शक्ति आहे, हें असो; पण अश्रद्ध वाचकांसहि तें त्यांतील वाङ्मयगुणामुळे व प्रासंगिक सुविचारामुळे आवडावयाला हरकत असूं नये अशी खात्री वाटते.

चरित्रनायक आणि चरित्रलेखक यांची अशी परस्परानुरक्त जोडी अन्यत्र सापडणे कठीण. लेखकांनी गुरूंचे चरित्र प्रत्यक्ष अनुभवलें. तेव्हां त्यांतील चमत्कारहि विश्वासार्ह मानूं नये तर काय करावें ? तृतीय खंडांत शेवटच्या कांही प्रकरणांत व्यक्त केलेले विचार फार मार्मिक आहेत. मातृभक्ति व वात्सल्य यांचा गोड समुद्रच सर्वत्र भरला आहे असें वाटते.

क्वचित् कांही ठिकाणीं पाल्हाळ वाटला तरी तो सद्विचारांचा असल्यामुळे एकंदर उपकारकच आहे. प्रथम खंडाच्या अभिप्रायांत 'महाराजांची समग्र वाङ्मयी मूर्ति' लवकरच अवतीर्ण व्हावी अशी आशा व्यक्त केली होती. ती जवळ जवळ पूर्ण झाली आहे. आता 'कृपानुभव' नांवाचा संकलित चवथा खंडहि शास्त्री-बोवांनी पूर्ण करावा अशी इच्छा आहे.

अश्रद्ध वाचकांना सश्रद्ध बनविण्यास व सश्रद्ध वाचकांची श्रद्धा आणखी दृढ करण्यास या ग्रंथाचा उपयोग होवो अशी इच्छा आहे.

द्वितीय खंडास प्रा. श्री. ना. बनहट्टी व तृतीय खंडास डॉ. के. ना. वाटवे यांच्या प्रस्तावना लाभल्या असून, त्यामुळे ग्रंथांची उपयुक्तता आणखीच वाढली आहे. श्री. श्री. के. क्षीरसागर यांचा पुरस्कारहि दिला असल्यामुळे अनेक चोखंदळ वाचकांची त्यामुळे सोय झाली आहे.

—पां. कृ. सावळापूरकर

गंधरेखा

श्रीयुत पुरुषोत्तम शिवराम रेगे यांच्या पन्नास स्फुट कवितांचा हा प्रातिनिधिक संग्रह आहे. रेगे यांच्या काव्याचा प्रमुख विषय एकच, तो म्हणजे स्त्रीसौंदर्य. स्त्रीसौंदर्यदर्शन हाच त्यांच्या प्रतिभेचा स्थायीभाव आहे. रेगे हे स्त्रीसौंदर्यानें वेडे झालेले कवि आहेत. स्त्रीच्या विभ्रमांत, नेत्रकटाक्षांत, स्मितांत, अंगविक्षेपांत निश्वसितांत आणि प्रामुख्यानें तिच्या देहाकृतींत जें सौंदर्य आहे त्यानें रेगे भुलून जातात, आणि आपली सौंदर्यात्म आणि ऐंद्रिय अनुभूति काव्यरचनेंत प्रगट करितात. या अनुभूतींची नोंद अत्यंत नाजुक व नाद-मधुर शद्बकलेचें साहाय्य घेऊन केलेली असते. त्यांची शद्बकळा ध्वनिसौन्दर्यानें व सूचकतेनें फुलारलेली आहे. रसिक वाचकांची सौन्दर्यवृत्ति पुलकित करणारी कोमल, स्निग्ध आणि अर्थगंभीर भाषा आणि तरल सौन्दर्यानुभूतींची उत्कट अभिव्यक्ति यांनी त्यांचें स्फुट शृंगारिक काव्य फुललेलें आहे. रेगे यांच्या कवितेंतील स्त्री कशी आहे तें ऐका—

विलोल तें लास्य, मादक आव्हान,
लावण्य अम्लान
••• ••• हटवाद ऐसा ज्वलंत अंगीं
नटवूं शके जो स्त्रीच एकली
युगानुयुगींची विलोभनशक्ति.

ती 'रतिकुशला व मनोज्ञ' आहे. ती 'युगानुयुगींची मन—बाधा' आहे.

अशा या विलोभनशक्तीभोंवतीच रेग्यांच्या कवित्ववृत्तीनें पिंगा घातलेला आहे. स्त्रीपुरुषांचें मीलन ही रेग्यांच्या काव्याची मूलभूत प्रेरणा आहे. कांही कवितांत मीलनाच्या मनोहर छटा वर्णन केल्या आहेत, तर 'तुझ्याविना' 'माझ्या जिवाच्या पांखरा' या कवितांत व्यक्त झालेली विरहव्यथा मनाला चटका लावणारी आहे. स्त्रीपुरुष—प्रेम हा त्यांच्या काव्याचा मुख्य पैलू असल्यामुळें त्यांच्या काव्यांत स्त्रीपुरुषांचें चिरंतन आकर्षण आणि ओढ प्रामुख्यानें प्रगट झालेली आहे. ही चिरंतन ओढ 'लिलीचीं फुलें,' 'चित्रांगत', 'पाहिलें न पाहिलें' या कवितांत शुद्ध व ऋजु स्वरूपांत व्यक्त होते तर कांही कवितांत किंचित् छटेल व उत्तान भावेंत प्रगट होते. चौर्य-समागम हाही रेग्यांच्या कवितेचा विषय आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'अभिसारिका' आणि 'अभिसार' या कवितेंत स्त्रीचें अभिसारिका म्हणून दर्शन होते. शृंगारिक काव्याच्या अभ्यासावर रेगे यांचें कविमन पोसलें आहे. त्यांच्या काव्यांत; संस्कृत काव्य आणि लावणीवाङ्मय यांच्यांतील अनेक संकेत प्रगट झाले आहेत. त्यांच्या काव्यांत संस्कृतांतील उत्तान शृंगाराच्या गहिऱ्या छटा उमटल्या आहेत. संस्कृतांतील उर्वशी – पुरूरव्याचें अनिवार, पुराण कामस्फूर्तीचें काव्य त्यांना मोह घालते. जुन्या मराठी काव्यांत शिळें झालेलें राधाकृष्ण शृंगाराचें रूपक रेग्यांनी नव्यानें वापरलें आहे. तसेंच एका ग्रीक लोककथेचाहि निर्देश त्यांच्या काव्यांत येऊन गेलेला आहे. जेथें जेथें त्यांना शृंगारिक काव्य आढळलें त्याचा कटाक्षानें अभ्यास करून रेग्यांनी आपली काव्यरचना केलेली आहे. त्यांच्या काव्याचा 'फुलोरा', 'हिमसेका'च्या प्रतीकांत व्यक्त होणारा काव्यसेक, त्यांच्या कल्पनाशक्तीचा 'दोला' आणि या जाणीवेच्या लांच्छनाच्या 'गंधरेखा', केवळ शृंगारिक वाङ्मयाच्या अभ्यासानें फुलल्या व उमटल्या आहेत. रेगे यांचें हें 'कामिक, रसिक, शृंगारिक' काव्य कां रचलें जातें व आपण मिटक्या मारीत तें कां वाचतो याचें मनोगाहनशास्त्रानुसार विश्लेषण केलें तर आपणांस असें आढळेल कीं, शृंगारिक गीतांतील रसाचा आस्वाद घेण्यांत आपण आपल्या कामवासनेचें उन्नयन करतो, आणि कलात्मक आनंद लुटतो. पण जेव्हां कवि इंद्रियनिष्ट भावनांचें आणि गुप्तसुप्त इच्छांचें उठवळ व प्रच्छन्न वर्णन करतो तेव्हां त्याची कविता विकृतीच्या वळणावर जाते. रेगे यांचें काव्य या दोषापासून मुक्त नाही.

कवीला स्त्रीदेहाचें कामात्मक आकर्षण आहे. स्त्री ही सृजनशक्तीचें प्रतीक आहे म्हणून रेग्यांनीं तिला आपल्या काव्याचा विषय केलें आहे असें जे एका खोकेठोक टीकाकारानें विधान केलें आहे तें बरोबर नाही. रेगे यांच्या कवितेंत स्त्रीचें माता, भगिनी इतकेंच काय दयिता अगर प्रियदेवता म्हणून फारसें स्पष्ट दर्शन होत नाहीं. स्त्रीच्या देहसौंदर्याचें कवीला कमालीचें आकर्षण आहे. संवेदना चाळवणारीं इंद्रियजन्य वासनांचीं वर्णनें करण्यांत रेगे फारच कुशल आहेत. त्याचीं अमाप उदाहरणें त्यांच्या काव्यांत आढळतील. स्त्रीपुरुषप्रेमांतील मुग्धभावनांचे पडसाद क्वचित् ठिकाणीं आढळले तरी स्त्रीसंबंधीचें वैषयिक आकर्षण जास्त स्पष्टपणें प्रगट झालें आहे. त्यांच्या काव्यांत भिन्न रसांचें लास्य नाही आणि भिन्न भावांचें नर्तन नाही. मुखपृष्ठावरील मस्तकविरहित स्त्रीदेहाची शिल्पकृति व अंटिपोटाजवळ चितारलेलें फुलपांखरूं स्त्रीसंबंधीचें कायिक आकर्षण दर्शवितात.

या स्फुट शृंगारिक कवितांखेरीज इतर कविता अगदीं सामान्य आणि नीरस आहेत. 'वर्षागान' या कवितेवर अनिलांच्या कवितेची दाट छाया पडली आहे, तर 'पोर आणि कुत्रें' व 'पेपर' या मर्ढेकरी वळणाच्या कविता आहेत. 'वर्षागान' या कवितेंत आशावादाचें स्तोत्र गाईलें आहे. शृंगारिक कविता लिहिण्यांत आपली कवित्वशक्ति खर्च करणाऱ्या या कवीनें देखील मानवतेचा संदेश दिलेला आहे. आशावादाची व मानवतेची उथळ आणि बालिश कविता मराठींत, अलिकडे 'गवताऐसी उदंड' वाढली आहे. आपल्याठायीं नैतिक सामर्थ्य असो वा नसो जगाला मानवतेचा संदेश देणें हें आजच्या स्वनामधन्य मराठी कवींचें ब्रीद होऊन बसलें आहे. मराठींतील तथाकथित आशावादी व मानवतावादी नवकविता पोकळ, ठोकळेबाज घोषवाक्यांनी भरलेली आहे. रेगे यांनी आपला स्वभावधर्म सोडून केवळ चलनी नाणें म्हणून मुक्तछंदांत आशावादाचें कवन रचलें आहे. कवि म्हणतो,

> झाड माझें लाल ज्याला
> आग्रहाचीं लाख पानें
> आणि माझी बंडखोरी
> घोषतो मी गात गाणें

कवीला कोणच्या विचारांचा आग्रह आहे आणि त्यानें कोणची बंडखोरी केली आहे हें एक त्या कवीलाच माहित ! त्याच्या काव्योद्यानांत सोनफुलें, सोलियाचीं फुलें, केतकी, लिलीचीं फुलें, मऊ जवसाचीं फुलें, कोरांटी, गुलबाशीचीं रानफुलें फुललीं असतील, पण त्याच्या काव्यवल्लरीला आग्रहाचीं 'लाख' (अगर 'लाल') पानें खासच आलेलीं नाहीत.

छंद

(द्वैमासिक– वर्ष १ अंक १. सप्टेंबर–आक्टोबर ५४)

सौ. सरिता रेगे यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'छंद' या नूतन द्वैमासिकाचा पहिला अंक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आमच्याकडे अभिप्रायार्थ आलेला आहे. ' छंद 'चें स्वरूप व मनीषा या लेखांत संपादिकेनें आपलें ईप्सित प्रगट केलें आहे. अंकांतील मजकुराची मांडणी आकर्षक आहे. मजकुरांतील वैविध्य डोळ्यांत भरणारें आहे. मात्र मजकुरांत बऱ्यावाईटाची सरमिसळ झालेली आहे. वा. ल. कुळकर्णी यांचा ' आशय आणि अभिव्यक्ति ' हा टीकालेख चांगला आहे. बी कवींच्या ' चांफा ' कवितेचें अनंत काणेकरकृत रसग्रहण चांगलें उतरलें नाही. मात्र मराठींतील निवडक प्रसिद्ध कवितांचें रसग्रहण प्रसिद्ध करण्याची कल्पना फारच उत्तम आहे. रसग्रहण संक्षिप्त असलें तरी सरस व सखोल असावे. ललित साहित्यांतील उत्कटता हा टीकालेख सामान्य आहे आणि रा. भि. जोशी यांनी अनुवादित केलेली पंजाबी कथा अगदींच साधारण आहे. मराठी लेखकांनी अनुवाद करतांना परभाषेंतील सर्वोत्कृष्ट वाङ्मयाचींच निवड करावी आणि या अनुवादानें मराठी वाङ्मयांत कांही मोलाची भर पडणार आहे कां याचा विचार करावा. आतां मराठींतील उत्कृष्ट कथांचे परभाषेंत अनुवाद करण्याची परिस्थिती आलेली आहे. रा. भि. जोशी यांनी स्वतः मराठींतील उत्कृष्ट कथांचे उर्दूत अनुवाद करावे. एखाद्या कृष्णचंद्राची मदत घ्यावी. परभाषेंतील सामान्य कथांचे अनुवाद छापणें मराठी मासिकांनी तात्काळ थांबविलें पाहिजे. परीक्षणें बऱ्यापैकीं आहेत. मात्र ' कथाई 'चें परीक्षण पूर्वग्रहदूषित आहे असें वाटते. ज्यांनी रूप कर्व्यक यांच्या सत्यकथेंत प्रसिद्ध झालेल्या ललित स्मृति वाचल्या असतील त्यांना त्यांच्या रसपूर्ण निवेदनाची कल्पना आली असेलच. याच रसिक लेखकाचें ' छंदा 'ला नियमित लेखनसहाय्य मिळणार आहे असें दिसते. ' छंद ' द्वैमासिकानें कथा कवितांपेक्षां वाङ्मयविवेचनाचा मजकूर जास्त द्यावा. कारण केवळ साहित्य समीक्षणाला वाहिलेल्या नियतकालिकांची आज फार गरज आहे. ' छंदा 'ला सुप्रसिद्ध चित्रकार द. ग. गोडसे यांचें चित्ररेखन सहाय्य लाभलेलें आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. ' छंदा 'चा उत्कर्ष होवो अशी आमची हार्दिक इच्छा आहे. — पां. ब. गाडगीळ

शांति

अलीकडे लघुकथा या वाङ्मयप्रकाराला मराठी वाङ्मयांत विशेष बहर आलेला आहे. इतर वाङ्मयप्रकारांच्या मानाने, लघुकथांच्या निर्मितीचें प्रमाण आज पुष्कळच वाढलेलें आहे. कादंबरी, नाटक हे त्या मानाने कांहीसे प्रदीर्घ स्वरूपाचे वाङ्मयप्रकार. त्यांतून समाजजीवनाचें व्यापक आणि विविधतापूर्ण दर्शन घडवितां येतें. त्या बाबतींत लघुकथेची उडी अर्थातच अगदी बेताची असते. तिच्यांतून मर्यादित स्वरूपाच्या व्यक्तिजीवनाच्या एकाददुसऱ्याच पैलूचें चित्रण केलेलें असतें. प्रारंभावस्थेंतली लघुकथा ही प्राधान्याने घटनाप्रधान स्वरूपाची होती. आजच्या लघुकथेमध्ये व्यक्तिमनाच्या कांही लक्षणीय विशेषांच्या दर्शनावर भर दिलेला आढळून येतो. श्री. शशिकांत पुनर्वसु यांचा मौज प्रकाशननें प्रसिद्ध केलेला ' शांति ' हा लघुकथासंग्रह आपण वाचून पाहिला म्हणजे लघुकथेच्या या नव्या स्वरुपाची आपणांस उत्तम रीतीने ओळख होऊं शकते. पुनर्वसूंच्या लघुकथासृष्टींतल्या दुर्गेश कट्टी, मुकुंद हरी, सिंधू, गणेश जोशी, गंगाधर, कल्याणी व केशव, जयराम व कावेरी, शंतनु या व्यक्ति आपल्या भोवतालच्या समाजांत, धुंडाळण्याचे विशेष परिश्रम न करतां, आढळण्यासारख्या आहेत; त्यांचीं सुखदुःखें—मुख्यतः दुःखेंच आपल्या परिचयाचीं आहेत. जयरामचें शिक्षण त्याच्या आईने शिवणटिपण करून कसेंबसें पूर्ण केलें. नोकरी लागल्यावर, आपल्या आईला म्हातारपणीं चार दिवस सुखाने जगतां यावें व आपल्या लहान भावाचें शिक्षण व्हावें, ही जयरामची स्वाभाविक इच्छा, पण जयरामने आईपासून वेगळे होऊन वेगळें घर करावें अशी जयरामच्या बायकोची म्हणजे कावेरीची इच्छा. जयराम बायकोपुढे नमतें घेत नाही. कावेरी पराभूत होते. असली कावेरी दर चार घरें ओलांडलीं की आपल्याला पाहायला मिळूं शकते. स्वतःला पैशाची विलक्षण चणचण जाणवत असतांनासुद्धा केवळ आपल्या भिडस्त स्वभावामुळे मूर्खासारखा पैसे खर्च करणारा मुकुंद हरि हा सुद्धा आपल्या नेहमीच्याच पाहण्यांतला आहे ना ? तात्पर्यार्थ हा की सर्वसामान्य मध्यमवर्गीयांच्या जीवनांतील सुखदुःखांचें पुनर्वसूंनी केलेलें चित्रण वाचकांना पटूं शकतें; पण वाचकांच्या मनावर प्रभावी संस्कार करूं शकेल अशा उत्कटत्वाची आणि अभिजात कलात्मकतेची मात्र त्यांच्या लघुकथांत उणीव भासते. १९३४ पासून १९५३ पर्यंतच्या त्यांच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथा या संग्रहांत समाविष्ट केलेल्या आहेत; म्हणजे गेलें दीडतप पुनर्वसूंचे लघुकथालेखन सुरू आहे. लघु-कथा या वाङ्मयप्रकाराबद्दलची त्यांची ओढ यावरून असाधारण कोटींतलीच वाटण्यासारखी आहे.

ज्या कथेचें नांव या संग्रहाला दिलेलें आहे ती 'शांति' विशेषतः उल्लेखनीय आहे. विवाहानंतर विवाहापूर्वीच्या व परवयाशीं लग्न झालेल्या प्रियेची भेट होणें हा अलीकडच्या कथाकारांचा एक आवडता विषय आहे. उदाहरण म्हणून अरविंद गोखल्यांची 'अधर्म', श्री. जं. जोशींची 'किनाऱ्यावरून परत' या कथा निर्देशिण्यासारख्या आहेत. 'शांति' ही याच प्रकारांत मोडणारी कथा आहे. या कथा लिहिण्यामागची मनोभूमिका कितपत हृद्य व आस्वाद्य आहे याचा विचर होणें आवश्यक आहे.

— अ. ना. देशपांडे

शांति : मौज प्रकाशन, किंमत ३ रुपये.

संघवार्ता

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ,
यांजकडून—

हिंगणघाट येथे वि. सा. संघशाखा

हिंगणघाट येथे विदर्भ साहित्य संघाची स्थापना दि. १४. ८. ५४ रोजीं करण्यांत येऊन खालील-प्रमाणे कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें:

अध्यक्ष : श्री. वि. वि. सोमण
उपाध्यक्ष : श्री. रा. ज. देशपांडे
चिटणीस श्री. रा. वि. करपे
सभासद श्रीमती विमलाताई घरोटे.
श्री. रा. ता. भांदककर, श्री. गो. बा. बाकरे व श्री. म. शा. पिंपळखुटे.

श्री. पृथ्वीराज कपूर यांची भेट

गुरुवार दि. १६–९–५४ रोजीं रंगभूमीचे सुप्रसिद्ध नट व दिग्दर्शक श्री. पृथ्वीराज कपूर यांनी वि. सा. संघाला भेट दिली. प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी त्यांचा परिचय करून दिला. श्री. पृथ्वीराज कपूर यांनी आजच्या रंगभूमिविषयी मनमोकळें आत्मकथन केलें.

सांस्कृतिक कार्यक्रम : कौमुदी उत्सव

समितीच्या पांचव्या मासिक कौमुदी कार्यक्रमांत दि. २१–९–५४ रोजीं दिवंगत कवयित्रींना श्रद्धांजलि आणि कवयित्रींचें कवितावाचन हा कार्यक्रम झाला. या प्रसंगी प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी दिवंगत कवयित्रींना श्रद्धांजलि अर्पण केली. नागपुरांतील सौ. विमलाबाई देशपांडे, सौ. विमलाबाई वेहरे, प्रा. सौ. शांताबाई शेळके, सौ. शांताबाई दंडिगे, सौ. प्रमिलाबाई भागवत, सौ. लीला श्रीवास्तव, सौ. उषा लिमये व श्रीमती अनुराधा परांडे यांनी आपापल्या निवडक दोन कविता वाचून दाखविल्या. भगिनींचा हा अभिनव कार्यक्रम फार बहारीचा झाला.

<u>खामगांव शाखावृत्त</u>

कोल्हटकर–स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघाच्या खामगांव शाखेतर्फे ता. २८ व रविवार ता. २९ ऑगस्ट रोजी कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या स्मृतिदिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहाच्या वातावरणांत व यशस्वी रीतीनें पार पडला.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शनिवार ता. २८ रोजीं शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची कोल्हटकर वाङ्मयविषयक भाषणें झालीं. त्यांत सरकारी मुलींच्या शाळेंतील कुमारी कोल्हेकर व कुमारी वोरवणकर यांना अनुक्रमें पहिलें व दुसरें व कुमार डोंगे याला तिसरें वक्षिस देण्यांत आलें. महाविद्यालयीन विभागांत श्री. अडावदकर या विद्यार्थ्याला पारितोषिक प्राप्त झालें. याखेरीज इतर वक्त्यांना उत्तेजनार्थ वक्षिसें जाहीर करण्यांत आलीं वि. सा. संघाच्या खामगांव शाखेचे अध्यक्ष डॉ. एकवोटे हे या प्रसंगी अध्यक्ष होते.

रविवार ता. २९ रोजीं सकाळीं नागपूरचे प्रसिद्ध साहित्यिक डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखालीं स्मृतिदिनाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. प्रारंभी डॉ. एकवोटे यांनीं प्रास्ताविक भाषण करून वि. सा. संघाच्या शाखेनें आखलेल्या कोल्हटकर स्मारकाच्या योजनेची कल्पना दिली. एक इमारत व त्या इमारतींत वाङ्मयाच्या अभ्यासूना उपयुक्त असें ग्रंथालय तसेंच रंगभूमि असें या स्मारकाचें स्वरूप राहावें अशी कल्पना असल्याचें त्यांनी सांगितलें.

नंतर वि. सा. संघशाखेचे उपाध्यक्ष श्री. द. रा. गोमकाळे यांनीं अध्यक्षांचा परिचय करून देणारें भाषण केलें. त्यानंतर प्रा. उर्ध्वरेषे यांनी स्मृतिदिनासाठी आलेले संदेश वाचून दाखविले.

यानंतर कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या सहवासाचा बराच लाभ मिळालेले जळगांव (जामोद) येथील वकील श्री. केशवराव जोशी व श्री. धांपेश्वरकर यांनीं, तसेंच खामगांवांतील श्री. भाऊसाहेब ओझरकर व श्री. देवीदासपंत अडावदकर यांनीं तात्यासाहेबांच्या आठवणी सांगितल्या. त्यानंतर डॉ. वि. भि. कोलते यांचे भाषण झालें. त्यांनी आपल्या भाषणाच्या आरंभी कोल्हटकर-स्मृतिदिनाचा उपक्रम सुरू केल्याबद्दल वि. सा. संघाच्या खामगांव शाखेचें मनःपूर्वक अभिनंदन केलें. श्रीपाद कृष्णाच्या कामगिरीचे मूल्यमापन करतांना डॉ. कोलते म्हणाले,

" तात्यासाहेबांच्या वाङ्मयांत केवळ मनोरंजन नसून त्यांच्या प्रत्येक कृतींत समाजसुधारणेच्या कोणत्या ना कोणत्या तत्वाला प्राधान्य दिलेलें आढळून येते. त्यांच्या विनोदी लेखांत समाजांतील दोषांवर ज्वलज्जहाल अशीं उपरोधिक टीका होती, पण या टीकेत चिपळूणकरांच्या टीकेतल्या प्रमाणें विषार नव्हता. तात्यांच्या उपहासाचे हत्यार कुणा व्यक्तीविरुद्ध नव्हते तर ते जुन्या, जीर्ण, बुरसलेल्या रूढी व कल्पना विरुद्ध चालविण्यांत आलें. "

कादंबरीकार व टीकाकार या नात्यानें श्रीपाद कृष्णांच्या साहित्यांतील स्थानाबद्दल थोडें विवेचन करून डॉ. कोलते यांनी कोल्हटकरांच्या नाट्यकृतींचेंही मूल्यमापन केले.

डॉ. कोलते यांनी आपल्या भाषणांत कोल्हटकरांच्या प्रतिभेच्या विविध अंगाचा सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. या बाबतीत कोल्हटकरांच्या नाटकांवर टीकाग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल श्री. द रा. गोमकाळे यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. तसेच कोल्हटकरांच्या सविस्तर चरित्राला उपयुक्त अशा आठवणी गोळा करण्याचें व त्याचप्रमाणें कोल्हटकरांच्या नाटकांच्या रंगावृत्त्या तयार करून ती नाटके रंगभूमीवर पुनरुज्जीवित करण्याचे काम वि. सा. संघाच्या खामगांव शाखेनें हाती घ्यावे असेहि डॉ. कोलते यांनी सुचविलें.

यानंतर बक्षिस समारंभ होऊन. सकाळचा कार्यक्रम संपला.

याच स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाचा भाग म्हणून दुपारी तीन ते सहा वाजेपर्यन्त गजानन टॉकीज मध्यें कोल्हटकरांच्या 'मूकनायक' 'प्रेमशोधन' व 'परिवर्तन' या तीन नाटकांतील सहा प्रवेश सादर करण्यांत आले. या नाट्यप्रवेशांत डॉ. बाबुराव पारसनीस, प्रा. नाईक, प्रा. डावरे, प्रा. तारे, प्रा. उर्ध्वरेषे व कुमार शरद गोमकाळे यांनी आणि कु. पुष्पा ठोसर, कु. इंदू कोल्हटकर, कु. शांता जोशी व कु. [illegible] यांनी कामे केली. या नाट्यप्रवेशाच्या जोडीलाच श्री. वणे मास्तर, श्री. सोहोनी व व श्री. महाजन यांनी म्हटलेली कोल्हटकरांची गीतें व टिळक राष्ट्रीय विद्यालयाचें वृंदवादन याचाहि कार्यक्रम झाला. हा कार्यक्रमहि अत्यंत यशस्वी रितीनें पार पडला व खच्चून भरलेल्या थिएटरांतील प्रेक्षकांनी या कार्यक्रमाचें उत्साहानें स्वागत केले...

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन.

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रतिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें,

मराठी–प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ★ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

दीपावलि विशेषांक १९५४

कांही लेखक आणि कवि

★ पु. य. देशपांडे	★ वा. वि. मिराशी	★ शरच्चंद्र मुक्तिबोध
★ दि. के. बेडेकर	★ ग. त्र्यं. देशपांडे	★ पु. शि. रेगे
★ द. के. केळकर	★ वि. भि. कोलते	★ वा. रा. कान्त
★ श्री. के. क्षीरसागर	★ कुसुमावती देशपांडे	★ इंदिरा संत
★ रा. वि. काळी	★ प्रभाकर माचवे	★ म. म. देशपांडे
★ मा. ज. कानेटकर	★ इंदुमती शेवडे	★ गुणाकर देशपांडे
★ नी. र. वऱ्हाडपांडे	★ अनसूया वाडेगांवकर	★ शंकर रामाणी
★ अ. ना. देशपांडे	★ पां. व. गाडगीळ	★ बाबा मोहोड

हें मासिक श्री. कुंडलराय मोहेकर यांनी अशोक मुद्रणालय, धर्मपेठ, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ह. ना. नेने, अध्यक्ष, वि. सा. संघ, यांनी संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ